सोमवार, १६ जानेवारी २०२३ ◆ वर्ष १५ ◆ अंक १७९
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


## अंतरंग


जर्मन कंपनी राज्यात करणार ३०० कोटींची गुंतवणूक/२

रोह्याच्या वरसे गावात कचरा प्रश्न गंभीर/५

युवोन्मेष समुहाची क्रिकेट स्पर्धा रंगली/८


## पंतप्रधान मोदींच्या मुंबई दौऱ्याची जय्यत तयारी



**मुंबई** : येथील महानगरपालिका कोणत्याही परिस्थितीत जिंकायचीच, असा निर्धार केलेल्या भाजप आणि शिवसेनेच्या शिंदे गटाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गुरुवारच्या (दि. १९) मुंबई भेटीत जोरदार शक्तिप्रदर्शनाची तयारी केली आहे. वांद्रे-कुर्ला संकुलात होणाऱ्या जाहीर सभेत एक ते दीड लाख लोक जमविण्याचे उद्दिष्ट दोन्ही पक्षांनी ठेवले आहे. पंतप्रधान मोदींच्या दौऱ्यात महापालिका निवडणुकीचे रणिशग फुंकले जाणार आहे. या वेळी सात विविध कामांचे भूमिपूजन तसेच दोन मेट्रो प्रकल्पांचे लोकार्पण केले जाणार आहे. वांद्रे-कुर्ला संकुलात होणारी जाहीर सभा यशस्वी करण्याची सिद्धता भाजप व शिंदे गटाकडून केली जात आहे. यामुळेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोस दौरा रद्द केला, तर मुंबई भाजप अध्यक्ष आमदार आशिष शेलारही तयारी करीत आहेत.

# नेपाळमध्ये विमान कोसळले

## पाच भारतीयांसह ६८ जणांचा मृत्यू



**काठमांडू : वृत्तसंस्था**

नेपाळमध्ये रविवारी (दि. १५) झालेल्या विमान अपघातात ६८ जण मृत्युमुखी पडले आहेत. यामध्ये पाच भारतीय प्रवाशांचा समावेश आहे.

६८ प्रवासी आणि चार क्रू सदस्य असलेले एटीआर-७२ हे विमान काठमांडू ते पोखरा या मार्गावर होते. पोखरा विमानतळावर लँडिंग करण्याच्या आधी ते काही अंतरावर असणाऱ्या सेती गंडकी नदीच्या काठावरील जंगलात कोसळले. त्यानंतर या विमानाला आग लागली.

अपघातावेळी विमानात ५३ नेपाळी, पाच भारतीय, चार रशियन, दोन कोरियन, तर प्रत्येकी एक आयरिश, एक अर्जेंटिनाचा व एक फ्रेंच नागरिक होता, अशी माहिती विमानतळ प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी दिली. यात ११ परदेशी पर्यटकांसह तीन नवजात व एकूण सहा मुले होती. या दुर्घटनेत ६८ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. खराब हवामानामुळे डोंगराला धडकून या विमानाचा अपघात झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे.

दरम्यान, या घटनेनंतर नेपाळचे पंतप्रधान पुष्प कमल दहल प्रचंड यांनी दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी सर्व सरकारी यंत्रणांना बचाव कार्यात सहकार्य करण्याचे आदेश दिले तसेच कॅबिनेटची तातडीची बैठक बोलावून परिस्थितीचा आढावा घेतला.

## नागपुरात भाजपचा नागो गाणारांना पाठिंबा

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यात सध्या विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकांचे वारे वाहत आहेत. अशात नागपूर शिक्षक मतदारसंघासाठी भाजपने नागो गाणार यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही माहिती दिली.

गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्र शिक्षक परिषद नागपूर शिक्षक मतदारसंघाची जागा लढवते आणि भाजपचा त्यास पाठिंबा असतो. यंदाही महाराष्ट्र शिक्षक परिषदेने नागो गाणार यांना उमेदवारी दिली आहे. गाणार यांच्या उमेदवारीला भाजपचा पाठिंबा असणार आहे.

दरम्यान, नाशिक पदवीधर मतदारसंघात काँग्रेसने सुधीर तांबे यांना एबी फॉर्म दिला, पण त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला नाही आणि त्यांचे पुत्र सत्यजीत तांबे यांना अपक्ष अर्ज भरला. त्यामुळे काँग्रेसने सुधीर तांबे यांचे निलंबन केले आहे. यावर त्यांनी त्या विषयावर सध्या काही बोलणार नाही. वेळ आल्यावर निर्णय घेऊ, असे म्हटले आहे.

# रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत पनवेलमध्ये विविध उपक्रम

## आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत रविवारी (दि. १५) विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांचे उद्घाटन भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्याचबरोबर सुरक्षा सप्ताह रॅलीला त्यांनी हिरवा झेंडा दाखविला.

रस्ते अपघातांची संख्या कमी व्हावी, मृत्यू व जखमींचे होण्याच्या घटना घडू नयेत यासाठी सरकारच्या वतीने दरवर्षी रस्ता सुरक्षा अभियान आयोजित केले जाते. कोरोना वैश्विक संकटानंतर यंदा मोठ्या प्रमाणात जनजागृती आणि प्रबोधन करणारे हे अभियान सुरू झाले आहे. पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेने सालाबादप्रमाणे यंदाही यासाठी पुढाकार घेतला. या अंतर्गत नवीन पनवेल येथील वृंदावनबाबा समाधी मंदिर सभागृहात रविवारी कच्छ युवक संघाच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. स्कूल व्हॅनचालक तसेच नागरिकांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्याचप्रमाणे विद्यार्थी वाहकांची नेत्रतपासणी करून त्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. नायर सुपर स्पेशलिटी आय हॉस्पिटल व नवदृष्टी सेवा संस्थेच्या मदतीने हे शिबिर घेण्यात आले. या वेळी डॉ. मालविका मिरज यांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.

उपक्रमाला बाळासाहेबांच्या शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे, सामाजिक कार्यकर्ते हरिष बेकावडे, पालक प्रतिनिधी विजया कदम, अ‍ॅड संदीप वाघ यांच्यासह वाहतूक पोलीस आणि प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारीही उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग हुमणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

तत्पूर्वी, नवीन पनवेल येथे रस्ता सुरक्षितता जनजागृतीपर रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी, पनवेल विद्यार्थी वाहक संस्था स्वयंशिस्त पाळणारी संघटना आहे. राज्याला आदर्श घालून देणारे काम या संस्थेकडून केले जात असल्याचे गौरवोद्गार काढले. कोरोनामध्ये अनेकांना मोठे नुकसान सहन करावे लागले. ते आर्थिकदृष्ट्या अडचणीत आले. यामध्ये स्कूल व्हॅनचालकांचाही समावेश होता. आता शाळा सुरू झाल्या असल्या तरी त्यांना काही अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या संदर्भात शासनाकडे पाठपुरावा करून परवाने व इतर प्रश्न निकाली काढण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून मी शंभर टक्के प्रयत्न करेन, अशी ग्वाहीदेखील त्यांनी या निमित्ताने दिली. कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल त्यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# ‘आमदार लक्ष्मण जगताप यांच्या नावाने लॉ कॉलेज सुरू करणार’

**पुणे : प्रतिनिधी**

दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या नावाने एक लॉ कॉलेज लवकरच सुरू करण्यात येणार आहे. यासोबतच महापालिकेच्या वतीने एक कॅन्सर हॉस्पिटल उभारण्यात येणार असून त्या हॉस्पिटललाही लक्ष्मण जगताप यांचे नाव दिले गेले पाहिजे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. **(पान २ वर..)**




## आठवण सांगताना उपमुख्यमंत्र्यांचे डोळे पाणावले

दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांची आठवण सांगताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, लक्ष्मणभाऊंच्या आजारपणात राज्यसभेची निवडणूक होती. निवडून येण्याचे गणित आम्ही मांडत होतो. अशा परिस्थितीत भाऊंची तब्बेत खालावलेली असल्याने त्यांना आणायचे की नाही, असा प्रश्न आमच्यासमोर होता. गिरीश महाजन हे त्यांच्या संपर्कात होते. लक्ष्मणभाऊंनी शंकर जगताप यांच्याकडे निरोप दिला. त्यांच्याकडून आम्हाला सांगण्यात आले की भाऊ येणार आहेत. इतकी तब्बेत खालावलेली असताना पीपीई किट घालून लाईफ सेव्हिंग रुग्णवाहिकेतून ते मुंबईत आले. आम्ही सर्व जण खाली त्यांना घ्यायला उभे होतो. पीपीई किट, मास्क घातलेले लक्ष्मणभाऊ चाचपडत खाली उतरले. विरोधी पक्षनेते असताना ते सॅल्युट करून म्हणाले, मुख्यमंत्रीसाहेब तुमच्यासाठी आलो. आजही ती आठवण आली की डोळे भरून येतात, असे सांगत असताना उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे डोळे भरून आले.

## निवडक

### छोटा राजनचा वाढदिवस साजरा करणाऱ्याला बेड्या

**मुंबई** : जेलमध्ये असलेला कुख्यात गुंड छोटा राजन याचा वाढदिवस साजरा केल्याची छायाचित्रे दोन दिवसांपासून समाजमाध्यमांवर प्रसारित होत आहेत. याबाबत टिळकनगर पोलिसांनी वाढदिवस साजरा करणारे उद्धव ठाकरे गटाचे नवी मुंबईचे संपर्कप्रमुख निलेश (आप्पा) पराडकर यांच्यावर गुन्हा दाखल करून शनिवारी रात्री अटक करण्यात आली. त्यांना रविवारी (दि. १५) न्यायालयात हजर केले असता काही अटी शर्तींसह २५ हजार रुपयांच्या जात मुचलक्यावर जामीन देण्यात आला.

### खासदार सुप्रिया सुळेंच्या साडीला आग; सुदैवाने बचावल्या

**पुणे** : हिंजवडी येथे रविवारी (दि. १५) एका कार्यक्रमाचे दीपप्रज्वलनाद्वारे उद्घाटन करताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या साडीने अचाकनपणे पेट घेतल्याची घटना घडली. ही बाब वेळीच लक्षात आल्यामुळे तत्काळ आग विझविण्यात आली. सुदैवाने यात खासदार सुळे यांना कोणतीही इजा झालेली नाही. त्या सुखरूप आहेत.

# माणगावजवळ कंटेनरच्या धडकेत दोन दुचाकीस्वार ठार



**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर माणगावजवळील तिलोरे गावच्या हद्दीत भरधाव कंटेनरची धडक बसून दुचाकीस्वार दोघांचा मृत्यू झाला. हा अपघात रविवारी (दि. १५) मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास घडला.

याबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी राजेंद्र गंगाराम राइका हे त्यांच्या ताब्यातील कार चालवित असताना माणगावकडून येणाऱ्या एका कंटेनरच्या (एमएच ४६-बीएम ०६७६) चालकाने त्याच्या ताब्यातील कंटेनर हा रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगात चालवत माणगाव बाजूकडे जाणाऱ्या मोटरसायकलला (एमएच-०२ इजी १३८५) आपल्या वाहनाची धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील विशाल संजय सकपाळ (वय ३४, रा. दिवा, जि. ठाणे) व राजेश राजाराम धामणकर (वय ३०, रा. खार, मुंबई) यांचा मृत्यू झाला.

या अपघाताची माहिती मिळताच अतिरिक्त कार्यभार असलेले उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सुर्यवंशी व माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी अपघातस्थळी भेट दित पाहणी केली तसेच पुढील कार्यवाहीसाठी निर्देश दिले.

या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात येऊन कंटेनरवरील अज्ञात चालकावर विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक सहाय्यक निरीक्षक श्री. लहांगे करीत आहेत.






**पनवेल : कोकण विभाग शिक्षक मतदारसंघातील भाजप, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी शनिवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेत आशीर्वाद घेतले. या वेळी भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, शहर अध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस अमरीश मोकल, संजय भगत आदी उपस्थित होते.** (छाया : विकास म्हात्रे)

# सोशल मीडियातही तिळगुळाचा गोडवा

## मकरसंक्रांतीच्या शुभेच्छांची व्हॉट्सअ‍ॅपवर देवाणघेवाण




**खोपोली : प्रतिनिधी**

सध्या अनेक तरुणांकडे अ‍ॅण्ड्रॉईड मोबाईल तसेच आयफोन हाती असल्याने कुठलाही सण-उत्सव अथवा एखाद्या व्यक्तीला शुभेच्छा व्हॉट्सअ‍ॅप व अन्य सोशल मीडिया नेटवर्किंग साइट्स, अ‍ॅपच्या माध्यमातून देण्यात येत असतात. मकरसंक्रांतीच्या निमित्ताने रविवारी (दि. १५) व्हॉट्सअ‍ॅप हे रंगीबेरंगी तिळगुळाच्या फोटो, व्हिडीओंनी रंगले होते.

मकरसंक्रांतीनिमित्त ‘तीळगूळ घ्या गोडगोड बोला,’ ‘कणभर तीळ, मणभर प्रेम, गुळाचा गोडवा आपुलकी वाढवा’, ‘परक्यांनाही आपलंसं करतील असे काही गोड शब्द असतात, शब्दांनाही कोडं पडावं अशी गोड माणसं असतात आणि किती मोठं भाग्य असतं जेव्हा ती गोड माणसं आपली असतात,’ ‘लई परेशानी आहे राव या व्हॉट्सअ‍ॅपची, तीळगूळसुद्धा व्हॉट्सअ‍ॅपवर येतात, ते घेतापण येईना आणि खातापण येईना’ असे संदेश ग्रुपमध्ये पाहायला मिळाले, तर ‘तिळगूळ द्यायचे असतील तर घरी या, कृपया व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवू नये. मोबाईलवर सकाळपासूनच लागलेल्या मुंग्या अजून गेलेल्या नाहीत,’ ‘आम्हाला संक्रांतीला गोड बोलायला सांगणे...,’ ‘तिळगूळ जर व्हॉट्सअ‍ॅपवर देणार असाल तर गोड बोलणेसुद्धा फक्त व्हॉट्सअ‍ॅपवरच होईल,’ अशा खोचक पुणेरी स्टाइलचे मेसेजेसही वाचायला मिळाले. विनोदी मेसेजेससह तीळगूळ घ्या आणि मागून गोड बोला, तोंडावर तर सगळेच गोड बोलतात, असे उपहासात्मक शैलीतील मेसेजही फॉरवर्ड केले जात होते.

## टीम इंडियाचा ‘विराट’ विजय



**तिरुवनंतपूरम : भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीने श्रीलंकेविरुद्धच्या तिसऱ्या वनडेत शानदार शतक झळकाविले. त्याने ११० चेंडूंत नाबाद १६६ धावांची खेळी केली. भारताने ३९० धावा केल्यानंतर श्रीलंकेला ७३ धावांत गुंडाळून वनडेतील सर्वांत मोठ्या विजयाची नोंद केली.**




# जर्मनीची कंपनी राज्यात करणार ३०० कोटींची गुंतवणूक

## ■ उद्योगमंत्री उदय सामंत यांची माहिती / ट्रम्प कंपनीसोबत सकारात्मक चर्चा

**मुंबई : वृत्तसंस्था**

जर्मनीची ट्रम्प कंपनी विजेवर चालणाऱ्या वाहनांच्या बॅटरी आणि बॅटरी स्टोरेज युनिट्स निर्मितीसंदर्भातील प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यात ३०० कोटींची गुंतवणूक करणार आहे. या कंपनीला राज्यात येण्याचे निमंत्रण देण्यात आले असून त्यांना उद्योग उभारणीसाठी सर्व सहकार्य करण्यात येणार असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

राज्यात गुंतवणूकवाढीसोबत रोजगार निर्मितीसाठी उद्योगमंत्री सामंत सध्या जर्मनीच्या दौऱ्यावर आहेत. पहिल्या दिवशी सामंत यांनी स्टुटगार्ट येथील ट्रम्प कंपनीला भेट दिली व गुंतवणूकवाढीबाबत सकारात्मक चर्चा केली. ट्रम्प कंपनीने पुढील दोन वर्षांत महाराष्ट्रात सुमारे तीनशे कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असल्याचे यावेळी स्पष्ट केले. यावेळी सामंत यांनी स्टुटगार्ट येथील ट्रम्प कंपनीच्या



उत्पादन निर्मिती केंद्राला भेट दिली. त्यावेळी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रिचर्ड बॅनम्युलर आणि व्यवस्थापकीय संचालक संदीप पाटील यांनी सामंत यांचे स्वागत केले.

बॅनम्युलर यांनी कंपनीच्या अत्याधुनिक लेझर कटिंग मशिन्स आणि फोल्डिंग मशिन्सचे सादरीकरण केले. विजेवर चालणाऱ्या वाहनांच्या बॅटरी आणि बॅटरी स्टोरेज युनिट्स तयार करण्यासाठी या मशिन्स वापरल्या जात आहेत. या मशिन्ससाठी ट्रम्फ कंपनी महाराष्ट्रात निर्मिती प्रकल्प सुरू करण्यास उत्सुकता दाखविली. त्यावर या प्रकल्पासाठी सरकार पूर्ण सहकार्य करेल असे आश्वासन सामंत यांनी दिले. कंपनीचे प्रतिनिधी पुढील महिन्यात महाराष्ट्राला भेट देऊन स्थळपाहणी करणार असल्याचे कंपनीने स्पष्ट केले.

सामंत यांनी यावेळी स्टुटगार्ट येथील लॅप काबेल समूहालाही भेट दिली. यावेळी बार्डनचे संचालक आणि भारताचे वाणिज्य दूत अँड्रियास लॅप यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी लॅप यांनी विद्यूत वाहन चार्जिंग केबल्समधील नवीन तंत्रज्ञान आणि पोर्टेबल ईव्ही अडॅप्टरचे सादरीकरण केले. समृद्धी महामार्गावर या तंत्रज्ञानाचा वापर करून यंत्रणा उभारण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

उच्च दर्जाच्या तांब्याच्या धातूसाठी प्रसिद्ध असलेल्या चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्याला भेट देण्याचे कंपनीला निमंत्रण देण्यात आले.

# पदपथावर उभ्या दुचाकींवर कारवाई करण्याची मागणी



**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेलमध्ये रस्त्याने चालण्यासाठी जागा नसताना दुचाकीवाले गाड्या पदपथावर उभ्या करू लागल्याने आता चालायचे कुठून? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. वाहतूक पोलिसांनी अशा दुचाकीचालकांवर कारवाई करण्याची मागणी नागरिक करीत आहेत. नवीन पनवेलमध्ये रेल्वेस्टेशनजवळ रस्त्याच्या कोणत्याही बाजूला जागा मिळेल तिथे रिक्षास्टँड अशी परिस्थिती झाली आहे. बिकानेर कोर्नरला रस्त्याच्या चारही बाजूला रिक्षा उभ्या केल्या जातात. त्यातच खरेदीसाठी आलेल्या ग्रहकांच्या दुचाकी त्याठिकाणी उभ्या केलेल्या असतात. त्यामुळे या ठिकाणी वाहतूक कोंडी होत असते. रस्त्यावर जागा शिल्लक नसेल तर पदपथावरच दुचाकी उभी करीत आहेत.

> **नवीन पनवेल स्टेशनजवळ अनेक सोसायटीत भाडेकरुना आपली वाहने सोसायटीच्या आवारात जागा असूनही लावून दिली जात नाहीत. त्यामुळे त्यांची वाहने रस्त्यावरच उभी करून ठेवलेली असतात. त्यामुळे रस्त्यावर चालण्यासाठी जागाच राहिलेली नाही. याबाबत कारवाई होणे गरजेचे आहे.**
> **–सुधाकर पाटील, नागरिक**

# नागोठण्यात संत निरंकारी मिशनच्या रक्तदानाला प्रतिसाद

**नागोठणे : प्रतिनिधी**

आध्यात्मिक जनजागृती बरोबर सामाजिक बांधिलकी तत्परतेने जोपासण्याचे महान कार्य संपूर्ण वैश्विक स्तरावर संत निरंकारी मिशनच्या विद्यमाने सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या कृपा छत्र छायेखाली सुरू आहे. यामध्ये रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, नैसर्गिक आपत्कालीन परिस्थितीत मदत, कोविड–१९ परिस्थितीमध्ये मदत, अशी समाजोपयोगी कार्ये अविरतपणे सुरु आहेत. कोंडगाव ब्रँच अंतर्गत नागोठणे येथे पार पडलेल्या रक्तदान शिबिरामध्ये रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत तब्बल १३१ दात्यांनी रक्तदान केले.

रायगड झोन ४० (अ) झोनल प्रमुख प्रकाश म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाने नागोठणे येथील श्री गणेश हॉल येथे रक्तदान शिबिर पार पडले. शिबिर शासनाच्या नियमांचे पालन करून मंडळाच्या आदेशान्वये पार पडले.

यावेळी पेण सेक्टरचे संयोजक महात्मा महादेव म्हात्रे तसेच ग्रामपंचायत नागोठणे उपसरपंच रंजना राऊत, सदस्य मोहन नागोठकर, प्रकाश कांबळे रोटरी क्लबचे अध्यक्ष सचिन मोदी उपस्थित होते. यावेळी प्रामुख्याने अलिबाग येथील जिल्हा रक्तपेढीचे रक्तपेढी संक्रमण अधिकारी डॉ. दिपक गोसावी व त्यांचे सहकारी यांनी रक्त संकलन केले. मानवमात्राच्या सेवेसाठी रक्तदान हे सर्व श्रेष्ठदान आहे. संत निरंकारी मिशन अध्यात्मिक जनजागृती बरोबरच सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे कार्य अविरतपणे करीत आहे. असे हनुमंत चव्हाण यांनी मनोगतात व्यक्त केले. तर डॉ. दीपक गोसावी यांनी संत निरंकारी मिशनची प्रशंसा करताना म्हणाले, रक्ताची मागणी दिवसेंदिवस वाढत असताना संत निरंकारी मिशनच्यावतीने वेळोवेळी रक्तदान शिबीर राबवून मोलाचे योगदान संत निरंकारी मिशन देत आहे. शिबीर सुंदररित्या पार पाडण्यासाठी पेण सेक्टर संयोजक महादेव म्हात्रे, कोंडगाव ब्रँच मुखी दगडू धामणे, सेवादल अधिकारी देविदास तेलंगेसह सेवादल युनिट नं. १५४० ब्रँच कोंडगांव व १२१७ ब्रँच रोहाच्या सर्व सेवादल आणि साथसंगत यांनी मोलाचे सहकार्य केले.



# पेणमध्ये महिला पतंगोत्सव साजरा

## रंगीबेरंगी पतंग हातात घेऊन शहरातून काढली रॅली







**पेण : प्रतिनिधी**

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय पेण व अंकुर ट्रस्ट व महिला अत्याचार विरोधी मंचमार्फत 'घे उंच भरारी' अभियानात महिला पतंग उत्सव व रस्ता सुरक्षा अभियानाचे आयोजन पेण प्रायव्हेट हायस्कूल येथे करण्यात आले होते.

यावेळी रॅली काढण्यात आली होती. या रॅलीची सुरवात गांधी मंदिरापासून पेण नगरपालिका तसेच सार्वजनिक शाळा मार्गे, प्रायव्हेट हायस्कूल पेण अशी नेण्यात आली. रंगीबेरंगी हातात पतंग घेऊन महात्मा गांधीमंदीरपासून वाजत गाजत निघालेल्या महिलाच्या रॅलीत सुमारे पाचशे मुली व महिला उपस्थित होत्या. यावेळी बोलताना आरटीओ माधव सूर्यवंशी यांनी देशातील रोड अपघाताची कारणमिमांसा करून जीवन सुरक्षिततेसाठी 'उजव्या बाजुने' चला या अभियानाचा शुभारंभ केला. तत्पूर्वी उपप्रादेशिक अधिकारी महेश देवकाते यांच्या हस्ते 'वॉक राईट' असा संदेश देणारा मोठा पतंग आकाशात सोडून उत्सवाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.यावेळी महीला पतंग उत्सव, आदिवासी मुलांचे नृत्य, डान्स, भाषणे करून पतंग उडवण्याचा आनंद घेतला. या कार्यक्रमास डॉ. वैशाली पाटील, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते, परिवहन अधिकारी माधव सुर्यवंशी, ॲड. मंगेश नेने, आदिवासी विकास प्रकल्पाच्या ज्योती वाघ, दिपश्री पोटफोडे, डॉ. नीता कदम, मुस्कान झटाम, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. रूपेश पाटकर, किरण पाटील, मोहन जोशी आदी मान्यवरांसह आदिवासी विद्यार्थी व विद्यार्थीनी महिला व पालक वर्ग शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२०१३च्या निर्भया बलात्कार प्रकरणानंतर सुरू झालेल्या महिला अत्याचार विरोधीमंच हा पतंगोत्सव दर वर्षी पेणकरांचेच नाही तर राज्यातील महिलांबरोबर सगळ्यांचे लक्ष वेधून घेणारा होता.

या वर्षी अंकुर ट्रस्ट, पतंगराव कदम कॉलेज इतिहास विभाग, आदिवासी विकास विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थीनी, चाईल्ड हेवन, आशा किरण हायस्कूल, आई डे केअर, सावरसई आश्रम शाळेच्या विद्यार्थिनींनी आकर्षक नुसते नृत्य, नाटीकाच केल्या नाही तर वंचित घटकातील महिलावर्गात सामाजिक सुरक्षिततेचा संदेशही दिला.



**पनवेल : पेण तालुक्यातील दादर ग्रामपंचायतीच्या नवनिर्वाचित सदस्यांनी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी युवा नेता प्रीतम म्हात्रे, माजी सरपंच विजय पाटील व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.**

# भूगोलात रमले पाथरज आश्रमशाळेतील विद्यार्थी

**कर्जत : प्रतिनिधी**

शासनाकडून दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. त्याचाच एक भाग म्हणजे आदिवासी मुलांसाठी आश्रमशाळा आहेत. कर्जत तालुक्यातील आयएससो मानांकन प्राप्त पाथरज आश्रमशाळेतील मुलांना शिक्षणाची गोडी निर्माण होण्याच्या दृष्टिकोनातून भूगोल दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या नावीन्यपूर्ण उपक्रमात विद्यार्थी रमले असल्याचे चित्र होते.रायगड जिल्हा भौगोलिकदृष्ट्या पसरलेला



आहे. तर जिल्ह्यात कर्जत व सुधागड या दोन तालुक्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी दुर्गम भाग आहे. त्यामुळे जिल्ह्यात आदिवासी मुलांना शिक्षण मिळावे यासाठी आदिवासी विभागाच्या आश्रमशाळा कार्यरत आहेत. कर्जत तालुक्यात आदिवासी विकास विभागाच्या ४ शाळा आहेत. त्यापैकी पाथरज या आयएससो मानांकन प्राप्त शाळेत भूगोल दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

त्या त्या विषयात अधिकचे ज्ञान मुलांना मिळावे यासाठी असे अनेक उपक्रम शाळेचे मुख्याध्यापक रमेश चव्हाण हे घेत असतात. या कार्यक्रमामध्ये नकाशे चित्र याचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील निमरोठ यांनी केले तर यावेळी शिवाजी खामकर, राजकुमार मते, परमेश्वर मेहत्रे, चौधरी आदी शिक्षक उपस्थित होते.

पान १ वरुन

## 'आमदार लक्ष्मण जगताप यांच्या नावाने लॉ कॉलेज सुरू करणार'

पिंपरी–चिंचवडमध्ये शनिवारी (दि. १४) दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांना आदरांजली वाहण्यासाठी सर्वपक्षीय शोकसभा आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या शोकसभेस पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री गिरीश महाजन, आमदार महेश लांडगे आदींची उपस्थिती होती.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, एक लॉ कॉलेज व्हावे अशी लक्ष्मणभाऊंची इच्छा होती. म्हणून आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला होता. या पार्श्वभूमीवर मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही पुढाकार घेतला. त्याच्या सगळ्या परवानग्या केल्या आणि आता लक्ष्मणभाऊंच्या नावाने हे लॉ कॉलेज या ठिकाणी आपण निश्चितपणे सुरू करणार आहोत. याचसोबत महेश लांडगे यांनी सूचित केले आहे, की महापालिकेच्या वतीने एक कॅन्सर हॉस्पिटल या ठिकाणी उभारण्यात येत आहे. त्यालाही लक्ष्मणभाऊंचे नाव आपण दिले पाहिजे. मला असे वाटते या सगळ्या सूचना अतिशय योग्य प्रकारच्या आहेत. ते तर आपण करूच, पण भाऊंचे कार्य, नाव पुढे चालत राहिले पाहिजे याकरिता अजून काही विचार समोर आले तर तेही विचार आपण कसे पुढे न्यायचे या संदर्भातील निश्चितपणे प्रयत्न करू.

# इतिहास संशोधक वसंत पाटील शब्दांपलीकडले व्यक्तिमत्व : ठमाताई पवार

**उरण : वार्ताहर**

इतिहास संशोधक वसंत भाऊ पाटील हे शब्दांपलीकडले व्यक्तिमत्व होते. त्यांनी इतिहास संशोधनातील केलेले कार्य महान असून, ते भावी पिढीला प्रेरणादायी असेच आहे. त्यांच्या जाण्याने आमच्या आदिवासी समाजाशी जोडलेली ही नाळ आता तुटून पडली आहे, असे भावनिक उदगार भारत देशातील स्त्रीशक्ती पुरस्कार प्राप्त कार्यकर्त्या ठमाताई पवार यांनी काढले. इतिहास संशोधक वसंत भाऊ पाटील यांना १४ जानेवारी रोजी चिरनेर जंगल सत्याग्रहातील रणसंग्रामाच्या अक्कादेवी आदिवासी वाडीतील ऐतिहासिक रणभूमीत आदिवासी कल्याण आश्रमाच्यावतीने, आयोजित करण्यात आलेल्या



शोकसभेत श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यावेळी त्या बोलत होत्या. या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते यशवंतराव पाटील, अभिनेते महेश सावंत, वसंत भाऊ पाटील यांच्या पत्नी मीरा पाटील, मयुरी पाटील, अभिनेते शंकर पवार, अभिनेते संतोष चौलकर, उदय टिळक, श्रीधर मोकल, विनोद इंदुलकर, सुदाम पवार, रमेश फोफेरकर, शिमग्या कातकरी, दीपक गोरे, श्रीपाद कात्राणे, विश्वनाथ नाईक, पंकज खारपाटील, दत्तात्रेय म्हात्रे उपस्थित होते.

ठमाताई पवार म्हणाल्या, वसंत भाऊ पाटील यांनी लेखणीच्या माध्यमातून आदिवासी समाजाला न्याय मिळवून दिला. ज्याचे पूर्वज सह्याद्रीच्या कुशीत स्वतंत्र जीवन जगले. त्या स्वतंत्र वृत्तीच्या आदिवासी समाजाच्या वारसदाराने देशाकरीता देहत्याग करून स्वातंत्र्याचा मार्ग दाखविला. त्या हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांचे नाव मुख्य स्मृतीस्तंभावर येण्यासाठी पाटील यांनी शासनाकडे पाठपुरावा केला असल्याचा उल्लेख त्यांनी यावेळी आवर्जून केला.

## गोवर प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या दुसऱ्या फेरीस सुरुवात

# पनवेल मनपा १४ हजार घरांचे करणार सर्वेक्षण

**पनवेल : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या सूचनांनुसार विशेष गोवर-रुबेला लसीकरण मोहिमेच्या दुसऱ्या फेरीस पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात रविवार (दि. १५)पासून सुरुवात करण्यात आली आहे. यासाठी गोवर प्रतिबंधात्मक लसीकरण टिमच्या १५० कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने १४ हजारपेक्षा जास्त घरांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

विशेष गोवर-रुबेला लसीकरण मोहीम पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात १५ ते २५ जानेवारी या कालावधीत राबविण्यात येणार आहे. आपल्या परिसरात गोवर-रुबेलाचे



रूग्ण आढळल्यास महापालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रास जरूर कळवावे, असे आवाहन महापालिकेच्या मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय रोज १५० टिमच्या साहाय्याने १४ हजार ७३५ घरांचे सर्वेक्षण या अंतर्गत केले जाणर आहे. यासाठी नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांची मदत घेतली जाणार आहे. नियमित लसीकरण वेळापत्रकानुसार गोवर- रुबेला लसीचा पहिला डोस नऊ महिने ते १२ महिने या वयात, तर दुसरा डोस १६ महिने ते २४ महिने या वयात घेणे अपेक्षित आहे. या अनुषंगाने आशावर्करर्स, एएनएम, जीएनएम यांना योग्य तऱ्हेने लसीकरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### 'नागरिकांनी सहकार्य करावे'

*या मोहिमेची पहिली फेरी १५ ते २५ डिसेंबर २०२२ या कालावधीत पूर्ण झाली असून दुसरी फेरी १५ ते २५ जानेवारी २०२३ या कालावधीत नियोजित करण्यात आली आहे. या लसीकरण मोहिमेस नागरिकांनी सहकार्य करावे, ज्या बालकांचे लसीकरण राहिले आहे अशा नागरिकांनी स्वयंस्फुर्तीने पुढे येऊन आपल्या बालकांचे गोवर-रुबेला लसीकरण पूर्ण करून घेण्याचे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.*



पनवेल : उरणमधील डोंगरी ग्रामपंचायतीवर भाजपचा झेंडा फडकला असून सरपंचपदी संकेत दिलीप घरत भरघोस मतांनी विजयी झाले. नवनिर्वाचित सरपंच संकेत घरत आणि विजयी सदस्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची रविवारी सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संकेत घरत व सहकाऱ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी उपमहापौर चारुशीला घरत, भाजपचे उरण तालुका सचिव दर्शन घरत, उपसरपंच अभिषेक घरत, सदस्य शोभा म्हात्रे, प्रियदर्शनी घरत, संदीप घरत, भावेश घरत, कमलाकर घरत आदी उपस्थित होते. (छाया : योगेश पाटील)




पनवेल : श्री संत वामनभाऊ व श्री संत भगवानबाबा यांचा पुण्यतिथी सोहळा कळंबोली येथे आयोजित करण्यात आला होता. या ठिकाणी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत वंदन केले. माजी नगरसेवक तेजस कांडपिळे सोबत होते. आयोजकांच्या वतीने त्यांचे स्वागत व सन्मान करण्यात आला. या वेळी माजी नगरसेवक बबन मुकादम, जि. प. च्या माजी सभापती प्रिया मुकादम, भाजप भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, बाळासाहेबांच्या शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे, सेवा समितीचे अध्यक्ष विजय गर्जे व पदाधिकारी, भाविक उपस्थित होते.



पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना मकरसंक्रांतीनिमित्त भाजपचे युवा नेते केदार भगत व त्यांच्या मित्र परिवाराने तिळगूळ देत शुभेच्छा दिल्या व आशीर्वाद घेतले. या वेळी सुमित दसवते, संकेत दसवते, हर्षद गाडगे, योगेश साळवी, नितेश भगत, संतोष वर्तळे, भावेश शिंदे, सचिन जाचक, यनेश पाटील, शेषनाथ गायकर आदी उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयाची इंडस्ट्रियल व्हिजिट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी १२ ते १४ जानेवारीदरम्यान हैदराबादमधील विविध कंपन्यांना भेट दिली.

या इंडस्ट्रियल व्हिजिटमध्ये विद्यालयातील सुमारे ४३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, तसेच हैदराबादमधील जिंदा तीलीसम या औषधी कंपनीला भेट दिली व त्या कंपनीमध्ये वेगवेगळे उत्पादन टूथपेस्ट, बालम व इतर आयुर्वेदिक औषधांविषयी माहिती घेतली तसेच रामोजी फिल्म सिटी, लेझरशो, हुसेन सागर लेक गोलकुंड फोर्ट या ठिकाणांना भेट दिली. प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना इंडस्ट्रियल व्हिजिटविषयी मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.

या इंडस्ट्रियल व्हिजिटचे आयोजन समन्वयक इंडस्ट्रियल व्हिजिट कमिटीच्या समन्वयक प्रा. शुभांगी वास्के यांनी केले व प्रा. राहुल कांबळे व प्रा. डॉ. अविनाश जुमारे यांनी सहकार्य केले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

## उरण खाडीत डिझेलची तस्करी

**उरण : रामप्रहर वृत्त**

डिझेलचा बेकायदा साठा असलेली एक संशयित बोट नवी मुंबई पोलिसांच्या सागरी सुरक्षा शाखेच्या हाती लागली आहे. या कारवाईत पाच लाखांचे दीड हजार लिटर डिझेल जप्त करण्यात आले असून उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.




नवी मुंबई पोलिसांच्या सागरी सुरक्षा शाखेच्या पथकाला नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत रविवारी पहाटे तीनच्या सुमारास उरणमधील पिरकोन ते वशेणी भागात खाडीमध्ये फायबरची बोट नांगरलेली आढळून आली.

सागरी सुरक्षा शाखेच्या पथकातील पोलिसांनी बोटीजवळ जाऊन पाहणी केली असता बोटीवर नाव अथवा कोणताही क्रमांक नसल्याचे, तसेच बोटीवर कोणीही व्यक्ती नसल्याचे त्यांना आढळून आले होते. यावेळी सागरी सुरक्षा शाखेच्या पथकाने केलेल्या तपासणीत बोटीत बेकायदा डिझेलचा साठा करून ठेवल्याचे आढळून आले.

त्यानंतर सागरी सुरक्षा शाखेच्या पथकाने खाडीमध्ये शोध घेतला, मात्र कोणीही सापडले नसल्याने बोटीमधील दीड हजार लिटर डिझेलचा साठा जप्त करून उरण पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे.




उलवे : भाजप उत्तर भारतीय मोर्चा, हनुमान मंदिर समिती, सकल हिंदू समाजाच्या वतीने आणि हिरा हमराही म्युझिकल ग्रुपच्या माध्यमातून मकरसंक्रातीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी आणि भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्वांना मकरसंक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी नवी मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, वहाळचे उपसरपंच अमर पाटील, हनुमान मंदिर समितीचे अध्यक्ष अवधेशकुमार महातो, मनोजकुमार मौर्या, विकास सिंह, ॲड. सुनील कुमार, मनोज यादव, ब्रिजेश गिरी, अखिलेश विश्वकर्मा, जवाहरलाल चौहान, बिपिन सिंह, गुलाब सिंह, महिला पदाधिकारी मिशा महतो, अंजू मौर्य, मंजू मौर्या, सोनी यादव, दीपा मौर्या आदी उपस्थित होते. (छाया : विकास म्हात्रे)

## तृणधान्यापासून पदार्थ बनविण्याचे प्रशिक्षण

**उरण : वार्ताहर**

वेश्वी येथे शनिवारी (दि. १४) मकरसंक्रातीचे औचित्य साधून, आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३ अंतर्गत महिलांना तृणधान्यापासून विविध पदार्थ बनविणे याविषयी प्रशिक्षण देण्यात आले.

पनवेलमधील स्नेहा देवधर यांनी महिलांना पाककला प्रात्यक्षिक करून दाखवले, तसेच डॉ. नीलिमा येवले यांनी महिलांना तृणधान्यमधील विविध घटक व त्यांचा आरोग्याला होणारा फायदा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तालुका कृषी अधिकारी शिगवण यांनी सर्व योजनांची माहिती तसेच तृणधान्याचे प्रकार व त्याचे फायदे याविषयी मार्गदर्शन केले, तसेच प्रा. कृषी पर्यवेक्षक आर. पी. भजनावळे, कृषी सहाय्यक डी. टी. केणी, वेश्वी कृषी सहाय्यक विभावरी चव्हाण यांनीही महिलांना तृणधान्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सांगता सर्व महिलांनी आठवड्यातून एकदा आहारामध्ये तृणधान्याचा नक्की वापर करू, अशी शपथ घेऊन केली. कार्यक्रमाला सर्व महिला बचतगट तसेच ग्रामपंचायत सदस्य सोनाली पाटील उपस्थित होत्या.



## वाहतूक शाखेतर्फे चालकांना तिळगूळ वाटप करून प्रबोधन

**पनवेल : प्रतिनिधी**

वाहतूक सुरक्षा सप्ताहाच्या अनुषंगाने पनवेल वाहतूक शाखेच्या हद्दीत नवीन पनवेल सिग्नल येथे संक्रांतीनिमित्त वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय नाळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी रविवारी (दि. १५) वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत चालकांमध्ये प्रबोधन करून तिळगूळ वाटप केले.

रस्ता सुरक्षा अभियान २०२३ सर्वत्र राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पनवेल शहरातील पंचमुखी सिग्नल, नवीन पनवेल सिग्नल, एचडीएफसी सर्कल व खांदा वसाहत येथे वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत जनजागृती करण्यात आली.

रस्ते अपघात वाहतुकीचे नियम न पाळले गेल्याने अनेकांचे जीव गेल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे या सप्ताहामध्ये वाहनचालकांमध्ये वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत वाहतूक



शाखेतर्फे पंचमुखी सिग्नल, नवीन पनवेल सिग्नल, एचडीएफसी सर्कल व खांदा वसाहत येथे वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत जनजागृती करण्यात आली. रविवारी नवीन पनवेल सिग्नल येथे वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत चालकांमध्ये प्रबोधन करून तिळगूळ वाटप करण्यात आले.

या वेळी वाहनचालकांना सीट बेल्टचा वापर करणे, हेल्मेट वापरणे, मद्यपान करून गाडी न चालवणे यांसाख्या गोष्टी पथनाट्य आणि फलकांच्या माध्यमातून समजावण्यात आल्या.

पनवेल वाहतूक वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय नाळे व त्यांचे पथक त्याचप्रमाणे कळंबोली वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक भरत साळुंके व पोलीस उपनिरीक्षक मोहन मुळीक यांनी हेल्मेट वापरासंदर्भात अधिक माहिती देत वाहतुकीचे नियम सर्वांनी पाळावे, असे आवाहन केले. या वेळी विद्यार्थी वाहक संस्थेच्या सहकार्याने रॅलीचेही आयोजन करण्यात आले होते.

## संपादकीय

# क्रीडा संस्कृती बहरतेय!

गुलाबी थंडीमुळे वातावरण आल्हाददायक बनले असताना सर्वत्र विविध खेळांची धूम आहे. स्थानिक ते राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये आपल्या राज्य, देशातील खेळाडू डंका वाजवत आहेत. अगदी छोट्या छोट्या गावातून आलेले खेळाडूही चमकदार कामगिरी करून यश संपादन करताना पहावयास मिळतात. क्रीडा संस्कृतीसाठी ही आनंददायी बाब म्हटली पाहिजे.

**क्रिकेटवेड्या भारतात चेंडूफळीचा खेळ म्हणजे जणू धर्म मानला जातो. पूर्वी ठराविक क्रिकेट मालिका, सामने होत असत. हल्ली मात्र क्रिकेट स्पर्धा वर्षाच्या बाराही महिने कुठे ना कुठे खेळल्या जातात. असे असूनही क्रिकेटविषयी चाहत्यांची क्रेझ कमी झालेली नाही. दुसरीकडे अलीकडच्या काळात इतर खेळांमध्येही भारतीयांची रूची वाढल्याचे दिसून येते. सध्या भारतीय पुरुष क्रिकेट संघ श्रीलंकेविरुद्ध दोन हात करीत आहेत. उभय देशांतील तीन सामन्यांची ट्वेन्टी-२० मालिका टीम इंडियाने जिंकली. त्यानंतर तीन वनडे सामन्यांची मालिकाही आपल्या नावे करीत दुहेरी यश संपादन केले. नवोदित-वरिष्ठ खेळाडूंचा भरणा असलेला भारतीय संघ चांगली कामगिरी करीत आहे. भविष्यात बलाढ्य संघांविरुद्ध तसेच मोठ्या स्पर्धांमध्ये ही लय कायम रहावी, अशी अपेक्षा आहे. भारतीय महिला संघही जोरात आहे. १९ वर्षाखालील टी-२० विश्वचषक स्पर्धा दक्षिण आफ्रिकेत आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत शेफाली वर्माच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने यजमान संघावर मात करत विजयी सलामी दिली. स्थानिक पातळीवर दिवाळीनंतर क्रिकेट हंगाम सुरू होतो व तो जानेवारीपर्यंत चालतो. त्यानंतर जवळपास मे महिन्यापर्यंत विद्युत प्रकाशझोतातील भव्य स्पर्धा होत असतात. सध्या ठिकठिकाणी दिवसा तसेच रात्रीही क्रिकेट स्पर्धा, लीग रंगत आहेत. यात खेळाडूंवर लाखो रुपयांच्या बक्षिसांची खैरात केली जात आहे. विशेष म्हणजे आपल्या देशात ओडिशामध्ये राष्ट्रीय खेळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हॉकी विश्वचषक स्पर्धा सुरू आहे. एकेकाळी या खेळात आपल्या देशाचे वर्चस्व होते. तो सुवर्णकाळ होता. कालांतराने मात्र कामगिरी घसरत गेली. आता पुन्हा एकदा हॉकीत भारताने उभारी घेतली आहे. गेल्या ऑलिम्पिकमध्ये भारताच्या पुरुष व महिला अशा दोन्ही संघांनी चांगली कामगिरी केली. अर्थात, त्यात आणखी सुधारणा आवश्यक आहे, परंतु हॉकीत आपण कात टाकू लागलोय हे नक्की! वर्ल्डकपमध्ये भारतीय संघही विजेतेपदाचा प्रबळ दावेदार आहे. स्पेनविरुद्ध सलामीची लढत जिंकून संघाने चुणूक दाखविली. आता येत्या सामन्यांमध्ये खेळात अधिक सुधारणा करून व अधिक ताकदीने उतरावे लागेल. मातीतला खेळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुस्तीचे फड आखाड्यात रंगू लागले आहेत. महाराष्ट्रातील पुण्याचा पैलवान अभिजित कटके याने देशातील कुस्तीमधील सर्वोच्च किताब 'हिंद केसरी' पटकावून राज्याचे नाव उंचावले, तर पुण्यात झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत नांदेडच्या शिवराज राक्षे याने बाजी मारली. क्रिकेटव्यतिरिक्त अन्य खेळांमध्येही मोठी पारितोषिके आणि प्रायोजक मिळू लागले आहेत. मुख्य म्हणजे खेळ व खेळाडूंना सरकारचे मोठे पाठबळ मिळत आहे. त्यामुळे खेळातही करिअर होऊ शकते हे एव्हाना पालकांना उमगले आहे. शालेय पातळीपासूनच ते आपल्या पाल्यांना क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. म्हणून खेळांना सुगीचे दिवस येऊन खेळाडूंचीदेखील बरकत होऊ लागली आहे.**

# कर्जतमध्ये रेल्वे प्रवाशांचा जीवघेणा प्रवास





कर्जत हे मुंबई-पुणेदरम्यानचे मुख्य रेल्वेस्थानक आहे. त्यामुळे या स्थानकावर प्रवाशांची खूप गर्दी असते. या स्थानकातील पुणे बाजूकडील मुख्य पूल तांत्रिक कामानिमित्त तब्बल महिनाभर बंद करण्यात आला असून दोन, तीन व ईएमयू फलाटावर जाणाऱ्या व येणाऱ्या प्रवाशां बरोबरच भिसेगाव, गुंडगे परिसरातील नागरिकांची खूप गैरसोय होत असून शॉर्टकट म्हणून रूळ ओलांडताना हातावर जीव घेऊन प्रवास करण्याची वेळ प्रवासी व नागरिकांवर आली आहे. खरे तर या पुलाचे दुरुस्तीचे काम इतक्या हळू चालले आहे की, त्या कामाला दोन महिने लागतील असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे प्रवासी व नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

कर्जत रेल्वे स्थानकातून दररोज हजारो विद्यार्थी, चाकरमानी, व्यावसायिक प्रवास करीत असतात. या स्थानकात असलेला पुणे बाजू कडील पुलाचे तांत्रिक काम निघाल्याने हा पूल पूर्णपणे बंद केला आहे. हा पूल बंद केल्याने दररोज घाईघाईने गाडी पकडण्यासाठी जाणाऱ्या प्रवाशांचे अतोनात हाल सुरू झाले आहेत. तसेच पलीकडच्या बाजूला भिसेगाव, गुंडगे ही नगरपरिषद हद्दीतील गावे आहेत. रेल्वेच्या म्हणण्यानुसार पूर्व बाजूला असलेली तिघर, वर्णे, पळसदरी, वावर्ले, खैराट, बोरगाव, हातनोली, चौक आदी गावातील प्रवासी रिक्षा किंवा एसटीने येतात त्यांना हा पुलच सोईस्कर आहे. त्यांना बाजारपेठेत येण्यासाठी या पुलावरूनच यावे - जावे लागते. पर्यायी मार्गाने यायचे झाल्यास सुमारे दोन किलोमीटरचा वळसा घ्यावा लागत आहे. काही प्रवासी रूळ ओलांडून गाड्या पकडण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी पोलीस आणि रेल्वे सुरक्षा दलाचे जवान फलाटांवर ठाण मांडून बसले आहेत.

सुमारे महिनाभर हा पूल बंद असणार आहे. असे रेल्वे प्रशासनाने जाहीर केले असले तरी त्यासाठी सुमारे दोन महिन्यांचा कालावधी लागेल असे रेल्वेशी संबंधित असलेले अधिकारी खाजगीत बोलत असतात. दुरुस्तीचे काम सुरू असताना पर्यायी मार्गाने मुंबई बाजूकडील पुलाचा वापर करायचा ठरवल्यास फलाटावरून जाताना विना तिकीट म्हणून पकडले जाण्याची शक्यता आहे. लांबपल्ल्याच्या गाड्या एक नंबर फलाटावर येतात मात्र कधी कधी त्या दोन किंवा तीन नंबर फलाटावर आणाव्या लागतात. त्यावेळी प्रवाशांचे होणारे हाल बघवत नाहीत. तर लांबपल्ल्याच्या पुण्याकडून येणाऱ्या गाड्या दोन किंवा तीन नंबर फलाटावर येतात. त्यांची खूप गैरसोय होते. त्यातच कर्जतहून खोपोली कडे जाणाऱ्या व खोपोलीहून कर्जतला येणाऱ्या गाड्या दोन, तीन नंबरच्या फलाटावर येतात. तर मुंबईहून कर्जतला येणाऱ्या बहुतांश

**खबरबात**
**विजय मांडे**

लोकल ईएमयू फलाटावर किंवा दोन किंवा तीन नंबरच्या फलाटावर येतात. त्याप्रवाशांचे कुटुंब कबिल्यासह येता-जाता खूपच हाल होतात. हा पूल एक महिन्यासाठी बंद केला आहे. मात्र एक महिन्यात तरी काम होईल ना? असा प्रश्न उपस्थित होत आहे. हा पूल दहावा- बारा वर्षांपूर्वी नव्याने बांधला आहे मग हा पूल बंद का करण्यात आला आहे? पनवेलसाठी वेगळी लाईन टाकण्यासाठी हा पूल बंद करण्यात आला आहे काय? असे प्रश्नही उपस्थित होत आहेत.

काही वर्षांपूर्वी फलाटाच्या मधोमध एक पादचारी पूल बांधण्याचा रेल्वे प्रशासनाचा विचार होता. तो असता तरी पुलाची दुरुस्ती करण्याच्या कालावधीत त्या पुलाचा उपयोग झाला असता. त्यातच पंचवीस- तीस वर्षांपूर्वी रेल्वे स्थानकापासून एक-सव्वा किलोमीटर अंतरावर उड्डाण पूल बांधण्यात आला. त्यावेळी पश्चिमेकडे जाण्या साठी असलेले गेट बंद करण्यात आले. त्यावेळी असलेले सरपंच अनंत जोशी, पुंडलीक भोईर आदींनी आंदोलन केले होते. ते हिंसक झाले होते. त्यामध्ये काही आंदोलक जखमी झाले होते. त्यावेळी जोशी यांच्या डोक्यालाही इजा झाली होती. त्यावेळचा खटला हल्ली हल्ली पर्यंत सुरू होता. त्या गेटच्या जागेवर भुयारी मार्ग करावा असा प्रस्तावही काहींनी दिला होता. खासदार श्रीरंग बारणे यांनी त्यात लक्ष घालून त्याचा आराखडाही तयार झाला होता. परंतु त्यामध्ये मधल्या काळात झालेल्या राजकीय घडामोडींमुळे त्या भुयारी मार्गाचे काम थांबले असावे, अशी उघड चर्चा आहे.



दुरुस्तीचे काम झालेच पाहिजे त्याला कोणाचाही विरोध नाही. मात्र ते करताना नक्की किती दिवसात हे काम होणार आहे त्याचा अंदाज करायला हवा होता. तसेच कर्जतच्या पूर्व भागात तालुक्याच्या नव्वद - पंचांण्णव टक्के लोकवस्ती आहे. त्यामुळे होम प्लाटफार्म एक नंबर कडे असावा असा प्रयत्न देखील झाला होता. तो सुद्धा प्रलंबित आहे. सध्या पादचारी पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. तोपर्यंत मुंबईहून कर्जतपर्यंत येणाऱ्या लोकल गाड्या एक नंबर फलाटावर आणल्यास बराचसा प्रश्न मार्गी लागेल कारण लोकलमध्ये प्रवास करणारे पंचांण्णव टक्के प्रवासी कर्जतच्या पूर्व भागातील आहेत.

दुरुस्तीचे काम लवकर व्हावे यासाठी कर्जतच्या नगराध्यक्ष सुवर्णा जोशी नागरिकांसह रेल्वे स्थानकावर गेल्या होत्या. त्यांनी एखाद्याचा अपघात झाल्यास त्याला जबाबदार कोण? असा जाब विचारून पादचारी पुलाच्या दुरुस्तीचे काम लवकरात लवकर करावे. असे निवेदनही दिले. तर काही जण या दुरुस्तीच्या कामाला जास्तच उशीर झाला तर रेल रोको करण्याच्या पावित्र्याचा आहेत. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने दिलेल्या कालावधीत काम पूर्ण करण्यासाठी रात्रीचा दिवस केला तरी ते काम पूर्ण होणार नाही. मध्य रेल्वे प्रशासनाने २० डिसेंबर २०२२ पासून पादचारी पूल बंद ठेऊन काम सुरू केले व ते एक महिन्यात होईल. असे जाहीर केले होते. आता चार - पाच दिवसात २० जानेवारी उजाडेल त्यानंतर कर्जतकर उग्र आंदोलन करतील. त्यावेळी काय परिस्थिती असेल ते काळच ठरवील!

## बदलते तंत्रज्ञान

# फायरफॉक्सने भारतात पहिली इलेक्ट्रिक सायकल केली लाँच

अमेरिकन सायकल निर्माता फायरफॉक्सने आपली पहिली इलेक्ट्रिक सायकल भारतात लाँच केली आहे. ती ॲपद्वारे नियंत्रित केली जाऊ शकते. फायरफॉक्स अर्बन इको असे अमेरिकन सायकल निर्माता फायरफॉक्सने भारतात लाँच



केलेल्या इलेक्ट्रिक सायकलचे नाव आहे. ते जर्मन तंत्रज्ञानावर आधारित आहे. ही इलेक्ट्रिक सायकल ई-सायकल दिग्गजने डिझाईन केली आहे. ही ई-सायकल पूर्णपणे चार्ज होण्यासाठी सुमारे पाच तास लागतात.


जाणून घ्या ई-सायकलचे वैशिष्ट्ये : कंपनीचे म्हणणे आहे की, फायरफॉक्स अर्बन इको इलेक्ट्रिक सायकल थ्रॉटलद्वारे ताशी २५ किमी वेगाने पोहोचू शकते. १०-ह क्षमतेचा बॅटरी पॅक, ९० किलोमीटरची पेडल असिस्ट रेंज ऑफर करण्यास सक्षम आहे. यात पाच पेडल असिस्ट मोड देखील मिळतात. कंपनीचे म्हणणे आहे की, यात फ्लॅट हँडलबार, एर्गोनॉमिक ग्रिप्स आणि दोन्ही टोकांना डिस्क ब्रेक्स आहेत. याशिवाय इलेक्ट्रिक सायकलमध्ये सिंगल पॉवर बटण देखील आहे.

जाणून घ्या किंमत : फायरफॉक्स अर्बन इको भारतात ७४,९९९ रुपयांच्या किंमतीत लॉन्च करण्यात आला आहे. ई-बाईक फक्त ग्रे रंगात उपलब्ध आहे. तुम्हाला ते खरेदी करायचे असल्यास, तुम्ही ते ऑफलाइन तसेच फायरफॉक्सच्या अधिकृत वेबसाइट किंवा पेटीएमद्वारे बुक करू शकता.

शारिरिक हालचाल आणि राइडिंग शैली ट्रॅकर : अर्बन इको ही ॲप-नियंत्रित ई-बाईक आहे. ही फिट ॲपद्वारे नियंत्रित केली जाऊ शकते. या ॲपद्वारे, रायडर त्याचा वेग, कव्हर केलेले अंतर, बर्न झालेल्या कॅलरी आणि हृदयाची गती यांचा मागोवा घेऊ शकतो. त्यामुळे रायडरला त्याची शारिरिक हालचाल आणि राइडिंग शैली ट्रॅक करण्यास देखील मदत होते.

फायरफॉक्स बाइक्सचे सीईओ म्हणाले, ई-सायकल हे शहरी वेगामध्ये भविष्याशाली ठरेल. तसेच, सर्वच पारळ्यांवर ही सायकल आघाडीवर असेल. तसेच, आमचे मत आहे की हे एक मोठे काम आहे ते युरोपमध्ये यशस्वी झाले आहे. आता आम्हाला विश्वास आहे की ते भारतातही यशश्वी होईल. तसेच, पुढील २ ते ३ वर्षांमध्ये, इलेक्ट्रिक स्पेसवर लक्ष केंद्रित केले जाणार असून फायरफॉक्समध्ये, आम्ही मार्केटमधील आमच्या मेहनतीच्या जोरावर या सायकलचा विभाग वेगाने यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.

# मैं प्यार का राही हूँ..! : ओ. पी. नय्यर



भारतीय चित्रपट संगीत आणि त्यांची विविध घराणी यांचा धांडोळा घेताना पंजाब/लाहोर कडील ढंगदार संगीताचा विचार केल्याशिवाय रसिक पुढे जावूच शकत नाही. या संगीतात एक ह्रिदम होता. एक ठेका होता, जोश होता, उल्हास होता. जीवनाचं सार चैतन्यच जणू संगीतात सामावलं होत! या घराण्याचा आद्य पुरुष संगीतकार गुलाम हैदर असला तर त्या घराण्याचा ध्वज ज्या संगीतकाराने दाही दिशात फिरवून त्रिखंडात लौकिक मिळवला असा अवलिया संगीतकार म्हणजे ओंकार प्रसाद नय्यर अर्थात ओ.पी.नय्यर.

**निमित्त**

ओपी हा तसा बंडखोर संगीतकार. बंडखोर यासाठी त्याने प्रस्थापित संगीताची चाकोरी बदलली. तोवर भारतीय संगीत म्हणजे मनाला मंत्रमुग्ध करणारा अनुभव येत असताना ओपीने रसिकांच्या मनावर धुंदी तर घातलीच शिवाय साऱ्या शरीराला नाचायला/डोलायला शिकवलं. त्यांचे संगीत एक झपाटून टाकणार चेटूक होते. आज पन्नास वर्षाचा कालखंड उलटून गेला तरीही 'बहुत शुक्रिया बडी मेहरबानी, मेरी जिंदगी में हुजूर आप आये, आई ये मेहरबान बैठीये जाने जा, पुकारता चला हूँ मैं गली गली बहार की, कजरा मुहोब्बत वाला आन्खियो मे ऐसा डाला..' या गाण्याची गोडी तसूभरही कमी झाली नाही. उलट रसिकांच्या दिलातील ओपीच्या संगीताचा गहिरा, बादल आणखीनच दिवाना होत गेला.

ओपी आपल्यातून जावून आता तेरा वर्ष झाली. हिंदी सिनेमातून तो १९७२ पासूनच आऊट झाला होता. पण त्याची गाणी, त्याच तेच ऐटबाज राजबिंड राहणे. त्याची ती सुप्रसिद्ध शुभ्र वस्त्रातला त्याचा वावर यामुळे तो रसिकांना कायम भेटतच होता. ओपींच्या संगीताचं सर्वात ठळक आणि अधोरेखित कराव असं वैशिष्ट्य म्हणजे त्याने उभ्या कालखंडात सूरश्री लता मंगेशकरचा स्वर कधीच आपल्या संगीतात वापरला नाही. सारे संगीतकार, सारी सिनेसृष्टी जेव्हा लताच्या आवाजाकरीता जंग जंग पछाडत होते त्यावेळी ओपी मात्र लतां शिवाय तिच्याशी समांतर अशा काळात आपली कला कारकीर्द बहरून टाकत होता! लतांच्या स्वराबाबत ओपींच्या मनात जराही किल्मिष नव्हते. किंबहुना हजारो वर्षातून क्वचितच असा स्वर तयार होतो अशीच त्यांची भावना होती.

केवळ आपल्या संगीत रचनेकरीता लताचा आवाज फिट नाही ही त्या मागची प्रांजळ भावना होती. लताचा स्वर वापरला नाही, पण आशाचा स्वर मात्र ओपीच्या संगीताचा प्राण, स्वर ठरला. आशाने थोडी थोडकी नाही तर ६० सिनेमातून तब्बल ३१७ गाणी गायली त्यापैकी १६५ गाणी सोलो होती तर १२१ युगल गीते होती. आशाचा स्वर जोवर त्याच्या संगीतात होता तोवर संगीत हिट होत गेले. पण त्यानंतर मात्र संगीताला ओहोटी लागली. सुरुवातीला शमशाद बेगम, गीतादत्त या दोघींच्या स्वराने ओपींनी कारकीर्द सुरु केली. पुढे १९५७ च्या 'नया दौर' पासून आशाचा आवाज ओपी करीता प्रमुख स्वर ठरला. आशाच्या स्वराला स्थिरस्थारत्व देण्याचं काम ओपींनीच केले.

आज पाकिस्तानात असलेल्या लाहोर या कलासंपन्न शहरात १६ जानेवारी १९२६ रोजी ओपीचा जन्म झाला. उच्च विद्येचा वारसा लाभलेल्या नय्यर कुटुंबात ओपी मात्र अभ्यासात फारशी गती घेवू शकले नाहीत. गाणी/संगीत याची जन्मजात आवड. (ओपी पोटात असताना त्यांच्या आईला हार्मोनियम वाजविण्याचे आणि ऐकण्याचे डोहाळे लागले होते) जन्माच्या आधीपासून झालेले हे संगीताचे संस्कार त्यांना आयुष्यभर पुरले. त्यांनी शास्त्रीय संगीताचे विधिवत असे शिक्षण कधी घेतलेच नाही.

## क्लिक...क्लिक...!





**मुंबई : राज्यात थंडीचा कडाका गेला आठवडाभर कायम आहे. अनेक जिल्ह्यांत हुडहुडी वाढल्याने काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यात तापमानाचा पारा १० अंशाच्या खाली गेला आहे. मुंबईतही थंडीचा जोर चांगलाच वाढला आहे. या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत गरम कपड्यांची जोरात खरेदी सुरु झाल्याचे दिसत आहे.**

## आरोग्य प्रहर



# रक्तवाहिन्या साफ ठेवण्यासाठी 'हे' सुपरफुड्स फायदेशीर

हार्ट अटॅक हा जगातील सर्वात मोठा जीवघेणा आजार मानला जातो. चार जणांपैकी एका व्यक्तीच्या मृत्यूचं कारण हे हार्ट अटॅक असतं.

मुळात हार्ट अटॅक येण्याचं कारण म्हणजे धमन्यांमध्ये प्लॅमा होऊन आतील बाजूने धमनी अरूंद होते. परिणामी रक्त योग्यरित्या प्रवाहित होण्यास अडथळा येतो आणि हृदयाला पुरेसा रक्तपुरवठा होत नाही.

मात्र धमन्या सुरक्षित राहण्यासाठी काही खाद्यपदार्थ फायदेशीर ठरतात. असेच काही पदार्थ आहेत जे तुमच्या धमन्यांना आतील बाजूने निरोगी ठेवून हृदयाला सुरक्षित ठेवण्यास मदत करतात.

अळशीचे मानवी शरीराला अनेक फायदे होतात. धमन्यांसाठी हे एक चांगलं सूपरफूड मानलं जातं. अळशीच्या सेवनाने कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते त्याचसोबत ब्लड प्रेशर योग्य राहतं. यामुळे धमन्यांमध्ये रक्तांच्या गुठळ्या होत नाहीत.

डाळिंबामध्यये phytochemicals चं प्रमाण असतं. यामध्ये अँटीऑक्सिडंट असंत जे रक्तवाहिन्याच्या अस्तरांचं नुकसान होऊ देत नाही. डाळिंबाचा रस शरीरातील nitric oxide उत्तेजित करतं ज्यामुळे रक्तप्रवाह सुरळीत होतो.

ब्रोकोलीमध्ये व्हिटॅमीन सी आणि कॅल्शियम असतं. ज्या धमन्यांचं नुकसान होण्यापासून संरक्षण होतं. त्याचप्रमाणे यामध्ये असलेल्या फायबरमुळे कोल्स्ट्रॉलची पातळी चांगली राहण्यास मदत होते.

हळद :भारतीय मसाल्यामध्ये हळद ही आरोग्याच्या दृष्टीने गुणकारी मानली जाते. हळदीचा आहारात समावेश केल्याने धमन्यांचं नुकसान होत नाही आणि रक्ताच्या गुठळ्याही होत नाहीत.

दालचिनी : भारतीय मसाल्यातील अजून एक पदार्थ हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त मानला जातो तो म्हणजे दालचिनी. दालचिनीमध्ये कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करतं आणि धमन्यांच्या आत चरबी जमा होऊ देत नाही. परिणामी हार्ट अटॅकचा धोका टळतो.

# रोह्याच्या वरसे गावात कचरा प्रश्न गंभीर

## डम्पिंग ग्राउंडअभावी नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील लागून असलेल्या वरसे ग्रामपंचायतमध्ये कचऱ्याचा प्रश्न गंभीर बनला असून डम्पिंग ग्राउंडअभावी नागरिक घरातील कचरा इतर टाकताना दिसत आहेत. यामुळे जनतेच्या आरोग्य धोक्याचे येण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.

वरसेतील नागरिक कचरा कुठेही टाकत आहेत. दत्ताचा माला हा ग्राउंड परिसरात लगत असलेला नाला त्या परिसरात नागरिकांनी कचरा टाकून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरलेली आहे. वरसे ग्रामपंचायतमध्ये गेले तीन ते चार महिन्यांपासून डम्पिंग ग्राउंडचा प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामपंचायत प्रशासनाला अद्याप जागेचा तिढा सोडविता आला नसल्याने दिवसेंदिवस कचरा प्रश्न जटील बनला आहे. वरसे ग्रामपंचायतीमध्ये तसे पाहता नागरीकरण खूप मोठ्या प्रमाणात वाढत आहे. जवळपास दहा हजार लोकसंख्येचा वरती या ठिकाणी नागरिक राहत आहेत.



**‘कचऱ्यासाठी जागा नसणे हे दुर्दैव’**

**गेले अनेक वर्ष सत्तेकडे असणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये साधा डम्पिंग ग्राउंडसाठी जागा उपलब्ध करता आले नाही. ही दुर्दैव बाब असल्याची खंत भाजप युवा मोर्चा शहराध्यक्ष निलेश धुमाळ यांनी व्यक्त केली.**

अनेक इमारती उभे राहत असताना मात्र ग्रामपंचायत कचऱ्याचा प्रश्न सोडविण्यात हतबल झाल्याचे दिसून येत आहे

या मुळे आगामी काळात वरसे नेते व ग्रामपंचायत डम्पिंग ग्राउंडचा प्रश्न सोडविण्यात यशस्वी होतील का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे तर नागरिकांनी कचरा संदर्भात ग्रामपंचायतला सहकार्य करणे गरजेचे आहे. कचरा रस्त्यावर न टाकता योग्य ठिकाणी टाकावा असे बोलले जात आहे.

या विषयासंदर्भात ग्रामसेवक अशोक गुट्टे यांच्याशी संपर्क साधला असता नागरिकांची गैरसोय होते. याची आम्हाला कल्पना असून येत्या सात ते आठ दिवसांत जागेचा प्रश्न तातडीने सोडवणार असल्याची माहिती ग्रामसेवक अशोक गुट्टे यांनी दिली.

# थंडीचा आस्वाद घेण्यासाठी पर्यटकांची माथेरानला पसंती

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये गुलाबी थंडी अनुभवण्यासाठी पर्यटक येत असतात आणि त्यामुळे माथेरानमधील पर्यटन वाढीसाठी थंडीची चाहूल आणि माथेरान गारठणे ही सुचिन्ह समजली जात आहेत.



प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण असलेले माथेरान हे उत्तरेत निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे गुलाबी थंडीचा आनंद घेत आहेत, मात्र या पर्यटन हंगामातील सर्वांत थंड गार दिवस म्हणून आजच्या दिवसाची नोंद झाली आहे. शनिवारी (दि. १४) माथेरानचे तापमान ११.०६ अंश इतके खाली आले होते. दरम्यान, गतवर्षी याच महिन्यात २४ जानेवारी रोजी ०७.०६ अंश सेल्सिअस एवढा खाली पारा आला होता.

थंड हवेचे आणि गुलाबीचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरान हे थंड हवेचे ठिकाण थंडीने गारठले आहे. माथेरानमध्ये गुलाबी थंडी कडाक्याची पडली असून पाऱ्याने या वर्षातील सर्वाधिक नीचांक गाठला असून शनिवारी ११.०६अंश इतका खाली आला होता. या वर्षातील हिवाळ्यातील सर्वांत कमी तापमान असलेला आजचा दिवस ठरला आहे. या दिवसाची नोंद माथेरान येथील तापमान केंद्रात सर्वांत नीचांकी तापमान म्हणून झाली आहे. उत्तरेत निर्माण झालेले वातावरण यामुळे थंडी वाढणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज खरा ठरला असून माथेरानकर या गुलाबी थंडीत गारठले असून पर्यटक मात्र या गुलाबी थंडीची मजा घेत आहेत.

१४ जानेवारी २०२३ रोजी माथेरानचे हवामान एवढे थंड होते की, पारा इतका खाली आला की भर उन्हात सुद्धा थंडी जाणवत होती. सकाळपासून थंडीचा जोर होता. त्यात विकेंड असल्याने पर्यटकांसह स्थानिकांनीही या गुलाबी कडाक्याच्या थंडीचा अनुभव घेतला. शनिवारी सकाळी ८:३० वाजता नगरपालिकेचे तापमान निरीक्षक अन्सार महापुळे यांनी ११.०६ अंश इतका नोंदवले गेल्याची माहिती दिली. कोरोना निर्बंध उठविण्यात आल्यापासून माथेरानमध्ये पर्यटक बहुसंख्येने वळले असून या थंडीचा आस्वाद घेत आहेत. पारा आणखी खाली येईल अशी शक्यता असल्याने पर्यटक माथेरानला येतच आहेत.

दरम्यान, माथेरानच्या इतिहासातील सर्वांत जास्त थंडी गतवर्षी २४ जानेवारी रोजी होती आणि त्यावेळी पारा तब्बल ०७.०६ अंश इतका खाली आला होता. मागील वर्षी १० जानेवारी रोजी १०.०६ अंश तर ९ जानेवारी २०२२ रोजी १३.०६ अंश आणि २ डिसेंबर २०२१ रोजी पारा १४.०८ अंश इतका खाली आला होता.

> **माथेरानमध्ये गुलाबी थंडीचा अनुभव घेण्यासाठी पर्यटक येत असतात. त्यामुळे पारा दहा पर्यंत खाली येणे ही माथेरानमधील पर्यटन वाढीसाठी चांगली बातमी आहे. आमच्या विभागाने ही माहिती दिल्यानंतर आम्ही शासनाच्या वरिष्ठ स्तरावर कळविले आहे, मात्र ही माहिती मिळताच पर्यटक वाढणार हे नक्की आहे.**
>
> –सुरेखा भणगे, मुख्याधिकारी आणि प्रशासक माथेरान नगर परिषद

> **माथेरानची थंडी आम्ही पूर्वीपासून अनुभवली आहे, मात्र आता तापमान मोजण्याची यंत्रणा कार्यान्वित झाल्याने पारा खाली गेला आहे हे माहिती पडू लागले आहे. त्याचा फायदा पर्यटक वाढीसाठी होणार आणि माथेरानचे पर्यटन थंडीचा हंगाम संपेपर्यंत वाढू शकतो.**
>
> –अनिस शेख, व्यावसायिक

# कर्जत रेल्वेस्थानकातील पादचारी पुलाचे काम पूर्ण करण्याची मागणी



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वेस्थानकात पुणे दिशेकडे असलेला पादचारी पुल लोकल प्रवाशांसाठी बंद आहे. गेली महिनाभर हा पुल बंद असून आणखी दोन महिने पादचारी पुलाच्या दुरुस्तीचे काम केले जाणार आहे. त्यामुळे स्थानकातून कर्जत शहरात प्रवेश करणाऱ्या प्रवाशांचे हाल होत आहेत. पादचारी पुलाचे काम त्वरित पूर्ण करावे, अशी मागणी कर्जत नगर परिषदेच्या वतीने मध्य रेल्वेचे मुंबई विभागीय व्यवस्थापक यांना पत्राद्वारे करण्यात आली आहे.

मध्य रेल्वे वरील कर्जत रेल्वे स्थानकातील पुणे दिशेकडे असलेला पादचारी पुल दुरुस्तीच्या कामासाठी बंद आहे. गेली महिनाभर या पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरू असून आणखी दोन महिने हा पदाचारी पुल बंद असणार आहे. उपनगरीय लोकल मधून प्रवास करणारे कर्जतमधील नागरिक यांची कोंडी या पादचारी पुलाने केली आहे. पादचारी पूल बंद ठेवून प्रवाशांना कोणताही पर्याय उपलब्ध ठेवण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रवासी फलाटावरून उड्या मारून घरी जाण्याचा मार्ग अवलंबत आहेत. त्यात त्या भागात मध्य रेल्वेच्या मार्गावर चार मार्गिका आहेत. त्यामुळे प्रवाशांची रुळ ओलांडून घरी पोहचताना कसरत होत आहे. दूसरीकडे त्या मार्गावर सतत मालवाहू गाड्या उभ्या असतात आणि त्यामुळे प्रवाशांना पलीकडे शहरात जाता येत नाही, असे अध्यक्ष सुवर्णा जोशी यांनी म्हटले आहे.

दरम्यान, पादचारी पूलाचे काम करणारा ठेकेदार प्रत्यक्ष कामावर हजर नसतो. काम करण्यासाठी आवश्यक असलेले बांधकाम साहित्यदेखील उपलब्ध नसल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे प्रवाशांचा खोळंबा करण्याचे काम ठेकेदाराकडून होत असून त्या कामाची चौकशी करावी, अशी मागणी कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशनचे सचिव प्रभाकर गंगावणे यांनी केली आहे.

# केएमसी महाविद्यालयात राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह



**खोपोली : प्रतिनिधी**

राष्ट्रीय छात्र सेना पाच महाराष्ट्र गर्ल्स बटालियन मुंबई अ पथक यांच्या वतीने केएमसी महाविद्यालयात राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला. रस्ते परिवहन विभाग पनवेल मोटार वाहन निरीक्षक संदीप कित्ते, सहाय्यक पोलीस निरीक्षक खोपोली हरेश काळसेकर, सुधाकर लहाने, ॲड. संदेश धावरे कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती होती.

वाहतुकीचे नियम, विमा कवच, वाहनांचे कागद पत्र, या बद्दल माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या वेळी कप्तान शीतल गायकवाड, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष संजय पाटील, सेक्रेटरी किशोर पाटील, सदस्य दिनेश गुरव, सदस्य राजीव अभाणि, केएमसी महाविद्यालय प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, उपप्राचार्य बी सुर्यवंशी, राष्ट्रीय छात्र सेनेच्या वरिष्ठ दिव्या नाईक, शिवानी वर्मा, माधुरी कासार, प्रेरणा मुंढे, सृष्टी देसाई, सिमरन ठाकूर, गार्गी मसुरकर, वैभवी कोंडीलकर, रिया माळी आदी उपस्थित होत्या.

# कोतवाल बुद्रूक येथे मंदिराचा वर्धापन दिन

## सर्वपक्षीय नेत्यांची लाभली उपस्थिती

**पोलादपूर : प्रतिनिधी**

कोतवाल बुद्रुक येथील प्रसिध्द कालकाईमाता मंदिराचा चतुर्थ वर्धापनदिन सोहळा विधान परिषद गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (दि. १४) झाला.



या वेळी कोतवाल गावचे सुपुत्र सामाजिक, राजकीय, अध्यात्मिक, शैक्षणिक, कामगार क्षेत्रात अतुलनीय योगदानाबद्दल एसटी महामंडळातील सेवानिवृत्त अधिकारी अनंत हिराजी पार्टे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या अंगणवाडी सेविकांच्या सेवानिवृत्त नेत्या सविता दरेकर, नवनिर्वाचित सरपंच रेखा दळवी, उपसरपंच राजेश कदम व ज्येष्ठ नागरिकांचाही सत्कार करण्यात आला आहे.

या वेळी प्रमुख पाहुणे खासदार सुनील तटकरे, महाड विधानसभेचे आमदार भरत गोगावले, माजी नगरसेवक मुंबई भाजपचे उपाध्यक्ष प्रकाश दरेकर, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष व रायगड शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष हनुमंत जगताप, माजी राजिप अध्यक्षा अपेक्षा कारेकर, राजिपचे माजी प्रतोद सुभाष निकम, पोलादपूरचे माजी सभापती व नगरपंचायतीचे विरोधी पक्षनेता दिलीप भागवत, बिपीन म्हामूणकर, गजानन चव्हाण आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन विजय दरेकर यांनी केले. वर्धापनदिनानिमित्त सत्यनारायणाची महापूजा, महाअन्नप्रसाद, दिपोत्सव व भजन, भव्य नागरी सत्कारादरम्यान साई समर्थ प्रॉडक्शन निर्मित स्वाती महाडीक पुणेकर प्रस्तुत ’महाराष्ट्राचे मानकरी लोकधारा’ आदी कार्यक्रम झाले.


या सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान, महाडचे आमदार भरत गोगावले, राजिपचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक लक्ष्मण मोरे, बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे संपर्कप्रमुख किशोर जाधव आणि अन्य कार्यकर्तेही उपस्थित राहिले.

# मुरूडच्या पद्मदुर्गमध्ये शिवप्रेमींकडून जागर

**मुरूड : प्रतिनिधी**

पद्मदुर्ग जागर समिती मुरूड व कोकण कडा मित्र मंडळ रायगड सर्व संलग्न संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मदुर्ग जागर या कार्यक्रमात शेकडो शिवप्रेमींनी सहभाग घेतला होता.

महाड, नवी मुंबई, मुरूड, पनवेल आदी भागातील असंख्य शिवप्रेमी व पर्यटकांनी सकाळपासूनच समुद्रकिनारी होडीमधून जाण्यासाठी गर्दी केली होती. छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचा जाज्वल्य इतिहास जागृत ठेवण्यासाठी व पदमदुर्ग किल्ला संवर्धन करण्यासाठी दरवर्षी शिवप्रेमींकडून पदमदुर्ग जागर हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.



सकाळपासूनच पदमदुर्ग किल्ला फुलांच्या माळांनी सजवण्यात आला होता. या गडाची स्वछता व पालापाचोळा याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली होती. शिवपालखी वाजतगाजत मुरुड समुद्र किनारापासून बोटींनी गडावर आणण्यात आली. ढोल ताश्याच्या गजरात शिवपालखी गडावर नेण्यात आली. शिवकाळी पेहराव असणारे मावळे गडावर ढाल व भाला घेऊन जगता पहारा देऊ लागले होते.

राजपुरोहीत प्रकाश स्वामी जंगम यांच्या हस्ते शिवप्रतिमेची विधीवत पूजा करण्यात. मुरूड पद्मदुर्ग जागर समिती सचिव राहुल कासार व त्यांच्या पत्नी शुभांगी कासार यांच्या हस्ते गडपुजन करून शिवप्रतिमेला जलाभिषेख करण्यात आला. गडाच्या सर्व बुरुजावरून शिवपालखी फिरवण्यात आली. कोटेश्वरी मातेचे मूलस्थान हे पद्मदुर्ग किल्यात असल्याने त्याचे पूजन राजपुरोहित प्रकाशास्वामी जंगम त्यांच्या हस्ते करण्यात आले.

इतिहास अभ्यासक नितीन पावले व गजानन सरपाटील यांनी शिवरायांची राजनीती व सर्वधर्म समभाव जोपासून सर्व जातीचे मावळे घेऊन स्वराज्य घडवले याबाबतचे सविस्तर माहिती त्यांच्या व्याख्यानात सांगितली.

पद्मदुर्ग किल्ला संदर्भात महेश मोरे, ज्ञानेश्वर काकडे अनिकेत कदम यांनी या बाबत मार्गदर्शन केले. तसेच शिवरायांचे मावळे बाजीप्रभू देशपांडे यांनी पावनखिंड स्वराज्यासाठी कशी लढवली याचे रोमहर्षक वर्णन करून शिवप्रेमींना एक नवा जोश दिला.

शिव मर्दानी आखाडा साळाव येथुन आलेले शिव मावळ्यांनी विविध शौर्याचे खेळ दानपट्टा, तलवारबाजी मलखांब ,पारंपरिक गोंधळ सादर करण्यात आला.

या जागरमध्ये कोकण कडा मित्र मंडळ रायगड अध्यक्ष सुरेश पवार, मुरूड पद्मदुर्ग जागर समिती अध्यक्ष आशिल ठाकूर, विजय वाणी, रूपेश जामकर, मदन हणमंते, योगेश सुर्वे, महेंद्र मोहिते, महेश साळुंखे, संकेत आरकशी, राहुल कासार, सुनील शेळके, अच्युत चव्हाण, गणेश सतविडकर, बाळा साखरकर, अनिकेत पाटील, संदीप घरत, योगेश चोगले, प्रवीण पाटील, आकाश मुळेकर, अलिबाग ग्रुप, खारंबोली ग्रुप आदी शिवप्रेमी उपस्थित होते.

# मेंढपाळ घाटमाथ्यावरून रायगडमध्ये दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

पावसाळा संपल्यानंतर जानेवारी महिन्यात घाट माथ्यावरून मोठया संख्येने मेंढपाळ रायगडमध्ये उतरतात. घाटावर चाऱ्याची कमतरता व मेंढरांना कोकणात मुबलक चारा उपलब्ध होत असल्याने पुढील चार पाच महिने जनावरे सांभाळून दुग्ध व्यवसाय व त्यातून निर्वाहन करण्यासाठी कोकणाची निवड केली जाते. सध्या अनेक मेंढपाळ कळपे खोपोली व खालापूर तालुक्यात दाखल होत आहेत.



पावसाळा संपला की मेंढपाळांची पावले कोकणाकडे वळू लागतात. पाठीवर बिर्हाड घेवून अनेक कुटुंब कोकणात अनेक वर्षांपासून येत आहेत. लोणावळ्यावरून खंडाळा मार्गे बोरघाट उतरून अनेक मेंढपाळ खोपोलीत येवून नंतर खोपोलीच्या आजूबाजूचा परिसर, खालापूर तालुक्याचा ग्रामीण भाग तसेच पेण, सुधागड, पनवेल, उरण व कर्जत या शेजारच्या तालुक्यांमध्येही वास्तव्य करतात. भातशेती कापल्यानंतर अनेक शेतकरी या मेंढपाळांना आपल्या शेतात बसवतात.

मेंढ्यांच्या लेंड्यापासून तयार होणारे खत शेतीला फायदेशीर असल्याने शेतकरीही मेंढपाळांची वाट पाहतात. या दरम्यान आलेले धनगर व स्थानिकांमध्ये रात्री गप्पाचे फड रंगू लागल्याचे चित्र खालापूर तालुक्यात पहायला मिळत असून, कारखान्यांमुळे मोठया प्रमाणात शेती नामशेष झाली असलीतरी असलेल्या शेतीमध्ये मेंढर यावीत असा अट्टाहास अनेक शेतकऱ्यांचा आजही कायम असतो. त्यामुळेच मेंढपाळांचे तांडे खालापूर परिसरातील विविध भागात दाखल झाले आहेत.

# रस्ते सुरक्षितता मोहीम अभियानात एसटी चालक-वाहकांची नेत्र तपासणी

**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातर्फे रस्ते सुरक्षितता मोहीम अभियान राबविले जात आहे. या अभियानात आगारातील एसटी चालक, वाहक व कार्यालयातील कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली. २५ जानेवारीपर्यंत हे अभियान राबविले जाणार आहे.



कर्जत एसटी आगारात या रस्ते सुरक्षितता मोहीम अभियान सुरू आहे. या निमित्ताने नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कर्जत उपजिल्हा रुग्णालयाचे नेत्र चिकित्सा अधिकारी रमेश पोवार यांच्या हस्ते दीपप्रज्वलित करून अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी व्यवस्थापक शंकर यादव, नेत्र चिकित्सा अधिकारी अप्पा गोकाककर, लेखाकार अंकुश राठोड आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

यादव यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. राठोड यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर पोवार यांनी एसटी चालकांना तसेच वाचकांची दृष्टी चांगली हवी कारण त्यांच्यावर प्रवाशांची जबाबदारी असते. हे आगार आम्हाला नेहमीच सहकार्य करते त्यामुळे एक कर्तव्य म्हणून आम्ही नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन करीत असतो असे स्पष्ट केले. गोकाककर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

यानंतर उप जिल्हा रुग्णालयाच्या वतीने चालक, वाहक व अन्य कर्मचाऱ्यांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. या वेळी दीपक देशमुख, मेघा भरकले, सुनील चव्हाण, संजय गाढे आदी उपस्थित होते.

# स्वच्छतेसाठी नवी मुंबईकर एकवटले

## कामगारांना सुटी देऊन स्वत: केली साफसफाई

**नवी मुंबई : बातमीदार**

'माझा कचरा, माझी जबाबदारी' ही ओळ केवळ घोषवाक्यापुरती मर्यादित न ठेवता रविवारी (दि. १५) बेलापूर विभाग कार्यक्षेत्रातील नागरिकांनी पुढाकार घेत तेथील स्वच्छताकर्मींच्या दैनंदिन कामाचा सन्मान करण्यासाठी त्यांना सुट्टी दिली आणि स्वत: झाडूसह इतर स्वच्छता साधने हातात घेत रस्ते, गल्ल्यांची सफाई केली आणि स्वच्छतेचा नवा आदर्श स्वकृतीतून प्रदर्शित केला.

सकाळी ६.३० वाजल्यापासून बेलापूर विभागात ठिकठिकाणी नागरिक आपापल्या परिसरातील सफाई करण्यासाठी रस्त्यावर उतरले आणि २८००हून अधिक नागरिकांच्या





सहभागने जणू बेलापूर विभागात स्वच्छतेची व्यापक चळवळच उभी राहिली. यामध्ये तरुणाईची संख्या लक्षवेधी होती. वाशी विभागानंतर रविवारी बेलापूर विभागानेही स्वच्छताकर्मींच्या सेवाभावी कामाविषयी आपुलकी व आस्था दाखवित त्यांच्या जागी स्वत: झाडू हातात घेतला आणि त्यांच्या कामाचा सन्मान केला.

याचवेळी बेलापूर विभागातील स्वच्छताकर्मींसाठी बेलापूर विभाग कार्यालयाच्या बेलापूर भवन इमारतीत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सेक्टर १५ सीबीडी बेलापूर येथील क्रोमा समोरील मैदानात ३२५हून अधिक स्वच्छताकर्मींनी एकत्र येत सेक्टर ११ येथील बेलापूर भवनपर्यंत स्वच्छता रॅली काढली आणि स्वच्छतेविषयीचा प्रचार केला. कचरा वर्गीकरणाचे महत्त्व, प्लास्टिक प्रतिबंधाची गरज, ओल्या कचऱ्याची कंपोस्ट बास्केट वापरून घरच्या घरी अथवा सोसायटीच्या आवारात कम्पोस्ट पीट्सद्वारे विल्हेवाट अशा स्वच्छताविषयक अनेक महत्त्वाच्या गोष्टींविषयी फलक उंचावत तसेच घोषणा देत या स्वच्छताकर्मींना परिसर दणाणून सोडला.

महापालिका आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त तथा स्वच्छ भारत मिशनचे नमुंमपा नोडल अधिकारी डॉ. बाबासाहेब राजळे यांनी या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे बेलापूर विभागाच्या सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. मिताली संचेती यांचेसह सुयोग्य नियोजन केले. मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनावणे, स्वच्छता अधिकारी विजय पडघन यांनी स्वच्छता निरीक्षक सर्वश्री विजय नाईक, मिलींद तांडेल, किरण सोळसकर, पवन कुवे यांनी सर्व सहकारी तसेच स्वच्छता कामातील पर्यवेक्षकांना एकत्र घेऊन हा उपक्रम यशस्वी करण्यात मोलाचे योगदान दिले. परिमंडळ १ विभागाचे उपआयुक्त दादासाहेब चाबुकस्वार यांनीही सक्रिय सहभाग नोंदविला.

हार्ट फाउंडेशनचे प्रमुख डॉ. ईलीस जयकर यांच्या सहयोगाने, मेडिकव्हर हॉस्पिटल व ड्रीम ऑप्टिक्स यांच्या माध्यमातून आयोजित या शिबिरात स्वच्छताकर्मींची रक्तदाब तपासणी, मधुमेहासाठी रक्ततपासणी, बीएमडी तपासणी, नेत्रतपासणी, ईसीजी, तसेच दंतचिकित्सा अशा तपासण्या करण्यात आल्या.

## निवडक

### विद्यार्थ्यांना गणवेशाची भेट



**मोहोपाडा :** रसायनी पाताळगंगा औद्योगिक परिसरातील रायगड जिल्हा परिषद शाळा पौंध आदिवासीवाडी, अंगणवाडीतील शालेय विद्यार्थ्यांना दरवर्षीप्रमाणे माजी उपसरपंच नितिन महाब्दी आणि त्यांच्या पत्नी वैशाली महाब्दी यांच्या वतीने विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले. या वेळी माजगांवचे सरपंच गोपीनाथ जाधव, सदस्या कल्पना वाघे, शिक्षका रत्ना पाटील, मनिषा पाटील, अंगणवाडी सेविका रुपाली भोसले, जयवंत पाटील, नामदेव वाघे, कमलाकर वाघे, महिला मंडळ सरीता वाघे, निशा वाघे, सुमन वाघमारे आदी उपस्थित होते.

### महिलांना साड्यांचे वाटप



**पनवेल** : स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्या वतीने एकविरा महिला मंडळ ओएनजीसी कॉलनी येथे ५० महिलांना मोफत साड्यांचे वाटप करण्यात आले. मकरसंक्रांतीच्या पूर्वसंध्याचे निमित्त साधून व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या दिनाचे औचित्य साधून या साड्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमावेळी महेश साळुंखे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून सागीर तांबोळी या युवकाने आपल्या कार्यकर्त्यांसोबत पक्षात जाहीर प्रवेश केला. या कार्यक्रमाला उद्योजक राजूशेठ प्रधान, राजेश खुठले, विजय धोत्रे, समाधान कांबळे, ममताज पठाण व कार्यकर्ते उपस्थित होते.

### देशी दारूचा साठा जप्त

**पनवेल** : तालुक्यातील चिंचवण गाव येथून बेकायदेशीररित्या दारूची विक्री करणाऱ्यावर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई करीत देशी दारूचा साठा जप्त केला आहे. चिंचवण येथे एक ज्येष्ठ महिला बेकादेशीररित्या दारूची विक्री करीत असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी कारवाई करीत ९०० रुपये किमतीचे नऊ लिटर गावठी दारू जप्त केली.

### विश्राळी तलावात आढळला मृतदेह

**पनवेल** : शहरातील गुजराती शाळेजवळील विश्राळी तलावात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला आहे. त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. या व्यक्तीचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, उंची अंदाजे पाच फुट पाच इंच, दाडी मिशा वाढलेली काळी, उजव्या खांद्यावर त्रिशुल व ओम गोंदलेले असून उजव्या डोळ्याच्या वर जखम आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे (दूरध्वनी क्र.२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक गणेश फरताडे यांच्याशी संपर्क साधावा.

# नवी मुंबईमध्ये ५६ फूट आकाराची भव्य रांगोळी

## माजी आमदार संदीप नाईक यांचा उपक्रम




**नवी मुंबई : बातमीदार**

जी २० राष्ट्रगटाच्या शिखर परिषदेच्या यजमानपदाचा मान यावर्षी भारताला मिळाला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी या राष्ट्रगटाच्या अध्यक्षस्थानी विराजमान झाले आहेत. या शिखर परिषदेच्या स्वागतासाठी नवी मुंबई भाजपच्या वतीने माजी आमदार संदीप नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरखैरणे येथील रा. फ. नाईक विद्यालयाच्या प्रशस्त पटांगणावर ५६ फूट आकाराची भव्य रांगोळी साकारण्यात आली आहे.

या भव्य रांगोळीमध्ये जी २० राष्ट्रगटाचा २०२३ सालासाठीचा नवीन लोगो चित्रित करण्यात आला आहे. ही रांगोळी प्रदर्शित करतेवेळी माजी आमदार संदीप नाईक, भाजपचे महामंत्री संजय उपाध्याय, भाजपचे जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, माजी महापौर सागर नाईक, माजी महापौर जयवंत सुतार, माजी महापौर सुधाकर सोनवणे, माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, स्थायी समितीचे माजी सभापती अनंत सुतार, माजी नगरसेविका माधुरी सुतार, माजी नगरसेविका अपर्णा गवते यांच्यासह भाजपच्या युवा, महिला मोर्चा आणि अन्य आघाडीचे पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते, माजी नगरसेवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संदीप नाईक यांनी सर्वप्रथम उपस्थितांना मकरसंक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची यांची जी २० राष्ट्रगटाच्या अध्यक्षपदी झालेली निवड भारतीयांसाठी अभिमानास्पद असल्याचे सांगून संदीप नाईक यांनी पंतप्रधान मोदी यांची विकासात्मक धोरणे आणि या धोरणांची यशस्वी अंमलबजावणी यांची दखल जागतिक पातळीवर वेळोवेळी सन्मानपूर्वक घेण्यात आलेली आहे, असे सांगितले.

# शुद्धलेखन स्पर्धेला लाभला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय, पनवेल व कोकण मराठी साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शुद्धलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेच्या अध्यक्षा अॅड. सुनिता जोशी यांनी मराठी भाषेसंदर्भात माहिती सांगितली. भगिनी समाजाच्या रजनी भानू यांनी त्यांच्या संस्थेबद्दल माहिती दिली, तसेच मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष रोहिदास पोटे यांनी शुद्धलेखनासंबंधी मार्गदर्शन केले. ६० वर्षांवरील व ६० वर्षांखालील असे दोन गट या स्पर्धेसाठी करण्यात आले होते. यामध्ये ६० वर्षांवरील पुढच्या गटामध्ये प्रथम क्रमांक वंदना दाते, द्वितीय क्रमांक उर्मिला सप्रे, तृतीय क्रमांक स्मिता गोखले यांनी पटकावले तर ६० वर्षेखालील गटामध्ये प्रथम क्रमांक अर्चना अनिलकुमार कुळकर्णी, द्वितीय क्रमांक स्वाती चितळे तसेच तृतीय क्रमांक आदिती मराठे यांनी पटकावला.

या कार्यक्रमासाठी नागनाथ डोलारे, के. गो. लिमयेचे उपाध्यक्ष श्याम वालावलकर, सहकार्यवाह जयश्री शेट्ये, अॅड. माधुरी थळकर, ग्रंथपाल निकेता शिंदे, लिपिक संपदा जोशी, भगिनी समाज पनवेल या संस्थेच्या अध्यक्षा मनिषा भिडे, उपाध्यक्षा रजनी भानू, सचिव वैशाली कुलकर्णी उपस्थित होत्या.



# उरण-पनवेल मार्गावर कोल्ह्याचा संशयित मृत्यू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



उरण-पनवेल रस्त्याच्या कडेला रविवारी (दि. १५) एक कोल्हा मृतावस्थेत आढळला आहे. कोल्ह्याचा मृत्यू संशयीत असल्याचे बोलले जात आहे.

उरण परिसरतातील वन्यजीव धोक्यात आले आहेत. उरण हे सध्या औद्योगिकदृष्ट्या झपाट्याने विकसित होत असलेला तालुका आहे. त्यामुळे जंगलांची तोड केली जात आहे, तसेच डोंगरही पोखरले जात आहेत. त्यामुळे निसर्ग ही नष्ट होऊ लागली आहेत.

उरणच्या पश्चिम विभागात खाडीकिनाऱ्यावर कांदळवनात कोल्हे आढळले आहेत. काही दिवसांपूर्वी दोन कोल्हे दिसून आले होते. ही कोल्ह्याची प्रजाती लुप्त होऊ लागली आहे, तर काही दिवसांपूर्वी चिरनेरच्या जंगलात मोर आणि डुक्कर यांची शिकार केली जात आहे. त्यामुळे उरणमधील वन्यजीव धोक्यात आले आहेत.

# महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीतर्फे युवा चेतना दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या क्रीडावर्धिनीच्या माध्यमातून स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिन 'युवा चेतना दिन' म्हणून साजरा केला गेला. यानिमित्त संस्थेच्या नवी मुंबईतील तीनही शाळांचा एक कार्यक्रम नवीन पनवेल येथील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयाच्या क्रीडांगणावर आयोजित करण्यात आला.




या कार्यक्रमाला राष्ट्रीय कबड्डीपटू शक्तिसिंग यादव, सोमय्या महाविद्यालयाचे प्रा. सागर म्हात्रे, संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य देवदत्त भिशीकर, अॅड. सागर नेवसे, डॉ. संतोष देशपांडे, क्रीडावर्धिनीचे महामात्र सुधीर भोसले, सचिव डॉ. भरत व्हनकटे आदी मान्यवरांसह नवी मुंबईतील शाळांचे शाखाप्रमुख, हितचिंतक, निमंत्रित, पालक शिक्षक संघाचे प्रतिनिधी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शालेय विद्यार्थ्यांनी विविध क्रीडाप्रकार व शारीरिक कवायती सादर केल्या. त्यानंतर प्रमुख वक्ते प्रा. सागर म्हात्रे यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील अनेक प्रेरणादायी गोष्टी कथन करून त्यांनी स्वामीजींचे तेजस्वी जीवन उलगडले. कबड्डीपटू शक्तिसिंग यादव म्हणाले, स्वत:ची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी दिवसरात्र मेहनत करा. खेळ, अभ्यास किंवा जे काही कराल त्यात एकाग्रता वाढवा. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मोठे व्हा, असे आवाहन त्यांनी केले.

वेदांत पाटील याने युवकांना प्रतिज्ञा दिली. मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका निशा देवरे यांनी सूत्रसंचालन केले. संतोष देशपांडे यांनी आभार मानले. कळंबोलीतील विद्यार्थ्यांच्या वंदे मातरम् गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पाणपक्ष्यांची माहिती देणारे संकेतस्थळ, माहिती पुस्तिकेचे प्रकाशन

**पनवेल : प्रतिनिधी**

शासन नेहमीच विविध प्रकारची गणना करीत असते. यामधून मिळालेल्या माहितीवरुन त्याबद्दल भविष्यातील योजना करता येत असतात. त्याप्रमाणेच महापालिका क्षेत्रात असलेल्या तलावांमध्ये कोणकोणत्या प्रकारचे पक्षी येतात याचे विशिष्ट दस्ताऐवजीकरण होणे गरजेचे होते. त्यासाठी ही गणना करण्यात आली असून यामध्ये सुमारे चाळीस प्रकारच्या जाती-प्रजातीचे पक्षी येत असल्याची माहिती मिळाली आहे, असे प्रतिपादन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले.

पनवेल महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या माझी वसुंधरा या उपक्रमांतर्गत आशियाई पाणपक्षी



गणना २०२३ या विषयास अनुसरून आशियाई पाणपक्षांची माहिती देणारे संकेतस्थळ व माहिती पुस्तिकेचे प्रकाशन आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते वडाळे तलाव येथे नुकतेच झाले. या वेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, गणेश शेटे तसेच पर्यावरण विभागाचे उपायुक्त कैलास गावडे, पर्यावरण विभागाचे विभाग प्रमुख मनोज चव्हाण, पिल्लई आर्ट, सायन्स आणि कॉमर्स महाविद्यालयाचे प्राध्यापिका किरण देशमुख आणि विद्यार्थी, इन्फिनीटी फाउंडेशनचे आयुब आकुला आदी उपस्थित होते.

महापालिका क्षेत्रातील वडाळे तलाव, खांदेश्वर तलाव, तसेच इतर पाणथळ तलावांमध्ये हिवाळ्यात परदेशातून विविध प्रकारचे पक्षी येतात. त्यांची माहिती होण्याच्या दृष्टीने आशियाई पक्षी गणना २०२३ ही माहिती पुस्तिका छापली असल्याचे उपायुक्त कैलास गावडे यांनी सांगितले,

ही माहिती http://www.birdsofpanvel.blogspot.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून येत्या काळात जसजशी नवीन पक्षांची माहिती मिळेल तसतशी त्यांची माहिती या ब्लॉगवर प्रसारित करण्यात येणार आहे.

यानिमित्ताने छापण्यात आलेल्या विशेष टि-शर्टचे अनावरण या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांना स्थलांतरीत पक्षाची माहिती व्हावी, यासाठी त्यांच्या फोटोसह नावांचे पोस्टर्स याठिकाणी मांडण्यात आले होते.

पर्यावरण विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी पिल्लई आर्ट,सायन्स आणि कॉमर्स महाविद्यालयाच्या कॉमर्स विभागाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून काम पाहिले. लोकनेते दि. बा. पाटील शाळेचे विद्यार्थी तसेच कार्यक्रमास उपस्थित होते.

# कलाकारांचा मेळावा उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

फिल्म अँड थिएटर फेडरेशनच्या वतीने नवी मुंबई, ठाणे व रायगडमधील कलाकार, तंत्रज्ञांच्या एका मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. वाशी येथे झालेल्या या मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कलाकारांचे क्षेत्र आता मर्यादित राहिले नसून चित्रपट, नाट्य, लघुपट, टीव्ही मालिका यांच्याही पलिकडे ते गेले आहे. सोशल मीडिया तसेच ओटीटीच्या माध्यमातूनही अनेक कलाकार आता आपली कलाकृती सादर करीत आहे. असे करीत असतानाच त्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही बाब लक्षात घेऊन फिल्म अँड थिएटर फेडरेशनने मेळाव्याचे आयोजन केले होते. या वेळी अनेक कलाकार, तंत्रज्ञांनी आपल्या समस्या मांडल्या, तर काहींनी आपली कलाकृती सादर केली.

अशा प्रकारच्या मेळाव्याचे आयोजन नियमित करण्यात येईल, अशी माहिती ज्येष्ठ अभिनेत्री व मेळाव्याच्या मुख्य आयोजिका नयन पवार यांनी सांगितले, तर शीतल सातपुते व सचिन गायकवाड यांनी मेळाव्याच्या आयोजनाची कामगिरी पार पाडली. कार्यक्रमाला अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले, नाट्य निर्माते जनार्दन लवंगारे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

# माथेरानमध्ये विकासाचे वारे

## रस्त्यांची कामे युद्धपातळीवर सुरू; स्थानिकांकडून सरकारचे आभार



**माथेरान : रामप्रहर वृत्त**

ज्या गावात सुस्थितीत रस्ते असतात त्या गावाचा विकास हा हमखास प्रगतीपथावर असतो. त्याप्रमाणे सध्या माथेरानमधील दोन वर्षांपासून रेंगाळलेली रस्त्यांची कामे नव्या सरकारमुळे एमएमआरडीएच्या माध्यमातून युद्धपातळीवर सुरू आहेत. त्यामुळे स्थानिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

मुख्य रस्त्यावर असणाऱ्या रेस्टॉरंट, स्टॉल्स तसेच अन्य खाद्य पदार्थ दुकाने चपलांच्या दुकानात धुळीच्या त्रासाने अक्षरशः व्यापारी वर्गासह नागरिक सुध्दा त्रस्त झाले होते. ओबडधोबड समपातळी नसलेल्या रस्त्यावर चालताना अनेकांना पायदुखी, कंबरदुखी सारख्या आजारांनी ग्रासले होते, परंतु सध्या सुरू असलेल्या क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांमुळे धूळविरहित रस्त्यावर चालताना एक वेगळाच आनंद पर्यटकांना अनुभवायला मिळत आहे. त्यामुळे व्यापारी वर्गात समाधान व्यक्त होत आहे.

दरम्यान, पर्यावरण पूरक रस्त्याच्या कामांमुळे मुख्य रस्त्याला एक चांगला लूक आलेला आहे. त्यामुळे पर्यटकांना बाजारात वस्तू खरेदी करताना आनंद मिळणार आहे. धुळविरहित रस्त्यांमुळे मालाच नुकसान क्षमणार असल्याने मुख्यत्वे व्यापाऱ्यांना याचा लाभ होणार आहे. या सुंदर रस्त्यांमुळे बाजारपेठेच्या सौंदर्यात भर पडणार आहे, असे येथील लोकप्रतिनिधींचे म्हणणे आहे.

**खुप वर्षांनंतर बाजारपेठमधील रस्ता उत्तम प्रकारे क्ले पेव्हर ब्लॉकच्या साहाय्याने पूर्ण केला जात आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांना धुळीचा सामना करावा लागणार नसून दुकानातील मालाचे नुकसान होणार नाही. या रस्त्याच्या कामांत ज्या काही तांत्रिक अडचणी असतील त्या प्रशासकीय अधिकारी नक्कीच दूर करतील असा आम्हाला व्यापारी वर्गाला विश्वास आहे.**

**–राजेश चौधरी, अध्यक्ष व्यापारी संघटना माथेरान**

# पतसंस्थांनी डोळ्यांत तेल घालून आर्थिक शिस्त पाळावी -डॉ. उदय जोशी

**मुरूड : प्रतिनिधी**

सहकार क्षेत्राला अधिकाधिक स्थैर्य लाभावे यासाठी पतसंस्थांनी डोळ्यांत तेल घालून आर्थिक शिस्त पाळली पाहिजे, असे प्रतिपादन सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. उदय जोशी यांनी सभासद मेळाव्यात केले.

मुरूड येथील जयश्रीराम नागरी सहकारी पतसंस्थेच्या २९व्या वर्धापन दिनी सभासदांच्या मेळाव्यात मार्गदर्शन करताना डॉ. जोशी बोलत होते. ते म्हणाले की, देशात एक लाख १० हजार सहकारी पतसंस्था कार्यरत असुन २९ कोटी सभासदांमार्फत ११० लाख कोटी इतक्या ठेवी जमा झाल्या आहेत. एकूण लोकसंख्येच्या सुमारे २५ टक्के लोकसंख्या सहकार क्षेत्राशी जोडली गेली असून ७० टक्के लोकांचे केवायसी पुर्ण झाले आहे. सहकार क्षेत्र उन्नत झाले पाहिजे. दलित, आर्थिक दुर्बल, असंघटीत लोकांसाठी सहकार चळवळीतूनच आर्थिक प्रगती शक्य आहे.





पतसंस्थेची इभ्रत, समाजातील विश्वासार्हतेला तडा जाणार नाही, असे व्यवहार केले पाहिजेत असा सल्ला देत सभासदांना आर्थिक साक्षरता प्राप्त करण्यासाठी काही कानमंत्रही दिले. नफा तोट पत्रकातील फार ज्ञान नसले तरी संस्थेचा सीडी रेशा ७० टक्के, भांडवल पर्याप्तता, सीआरएआर १० टक्के, ग्रॉस एनपीए १५ टक्के तर नेट एनपीए पाच टक्के पेक्षा अधिक असू नये. संस्थेच्या व्याजदरापेक्षा एक ते दीड टक्का अधिक लाभांश वितरित करणाऱ्या संस्थेची आर्थिक स्थिती उत्तम असल्याचे समजावे, अशी महत्त्वपूर्ण माहिती सभासदांना दिली.

या वेळी व्यासपीठावर रायगड जिल्हा पतसंस्थांचा महासंघ सचिव योगेश मगर, जयश्रीराम पतसंस्थेचे अध्यक्ष दिलीप जोशी, उपाध्यक्ष प्रा. मेघराज जाधव, सचिव सुनील विरकुड, कोषाध्यक्ष बाळकृष्ण कासार, सहयोग पतसंस्थेचे संचालक निळकंठ खेमकर, सेवानिवृत्त नायब तहसीलदार दिलीप यादव, संचालक गणेश ठोसर, सिध्देश गद्रे, डॉ. संजय पाटील, प्रमोद उपाध्ये, अश्विनी पाटील, डॉ. अमित बेनकर उपस्थित होते.

प्रास्ताविकात अध्यक्ष दिलीप जोशी यांनी २९व्या वर्धापनदिनी ४२ कोटींच्या ठेवी व चार हजारांहून अधिक सभासद संख्या केवळ सभासंदासंह आजी–माजी संचालक व सेवा भावी वृत्तीच्या कर्मचाऱ्यांच्या योगदानामुळेच संस्थेच्या प्रगतीचा आलेख उंचावल्याचे सांगुन नवीन ठेव योजना व कर्ज योजनांची घोषणा करत भांडवल पर्याप्ततेसाठी भाग भांडवल वाढविण्याचे आवाहन केले. श्रीराम पतसंस्थेचा आर्थिक प्रगतीचा आलेख सभासदांसमोर संचालक सिद्धेश गद्रे यांनी पीपीटीद्वारे सादर केला.

सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले होते. सर व्यवस्थापक संजय ठाकूर व कर्मचारी वृंदाने परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सुनिल विरकुड यांनी तर आभार बाळकृष्ण कासार यांनी मानले.

# खालापुरात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

पंचायत समिती शिक्षण विभाग खालापूर आणि तालुका विज्ञान व गणित अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रिस येथील संजिवनी स्कूलच्या आवारात ५० वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन गटविकास अधिकारी बाळाजी शिवजी पुरी यांच्या हस्ते करण्यात आले.



या वेळी गटशिक्षणाधिकारी शिल्पा दास, रोटरी क्लबऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष अमित शाह, माजी सरपंच कृष्णा पारंगे, पार्वती सावळेकर चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अरविंद सावळेकर, केंद्रप्रमुख किशोर परदेशी, मुख्याध्यापिका वृशाली सावळेकर, रोटरीचे माजी अध्यक्ष गणेश काळे, बाळकृष्ण होणावळे, ऋतुजा भोसले, शशिकांत शानबाग, मेघा कोरडे, शारदा काळे, प्रतीक्षा कुरंगले व अनुराधा होणावळे आदी उपस्थित होते. या दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शनात २७ प्राथमिक शाळा व २१ माध्यमिक शाळा, एक आश्रमशाळा सहभागी झाल्या होत्या.

आकर्षक प्रतिकृती साकारलेल्या विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक गट प्रथम (राजिप शाळा सारंग) समिक्षा बामणे, द्वितीय (प्रिआ स्कूल मोहोपाडा) आर्यन पंडा, तृतीय (संजीवनी प्राथमिक स्कूल) दिक्षा सकपाळ तर माध्यमिक गट प्रथम (जनता विद्यालय खोपोली) कबीर सय्यद, द्वितीय (स्वामी विवेकानंद विद्यामंदिर खालापूर) मोहिनी घायाल, तृतीय (सरनेताजी पालकर विद्यामंदिर चौक) जिज्ञा शिंदे तसेच शिक्षक प्रतिकृती प्राथमिक प्रथम किरण धारणे (राजिप शाळा सांगडे), उत्तेजनार्थ हरि कोंडीलकर (राजिप शाळा मोहोपाडा), माध्यमिक प्रथम शशितलकुमार म्हात्रे (न्यू इंग्लिश स्कूल वावर्ले); वक्तृत्व स्पर्धेत प्राथमिक गट प्रथम वर्षा ओक (शिशूमंदीर खोपोली), द्वितीय आर्या बिरवाडकर (नेताजी पालकर विद्यामंदिर चौक), तृतीय शुभम नागरगोजे (महिला उद्योग मंडळ मोहोपाडा), माध्यमिक गट प्रथम जिज्ञा शिंदे (सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर चौक), द्वितीय श्रेया मोगल, तृतीय आर्या पाल (टिएन एम पब्लिक स्कूल आसरोटी) यांनी पटकाविले.

विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमासाठी संजिवनी स्कूलच्या मुख्याध्यापक वृशाली सावळेकर, वसुदा सहस्त्रबुद्धे, शितल कामत, मिना जंगम, सुरेखा कांदळगावकर, अलका कुमार, उषा देशपांडे आदींनी परिश्रम घेतले.

# एम. बी. मोरे शिक्षण संकुलाचे स्नेहसंमेलन

**रोहा : प्रतिनिधी**

एम. बी. मोरे फाऊंडेशन संस्थेच्या इंग्लिश मिडीयम स्कूल, कनिष्ठ महाविद्यालय आणि महिला महाविद्यालय यांचा शैक्षणिक वर्ष २०२२–२३चा स्नेहसंमेलन कार्यक्रम शनिवारी (दि. १४) आयोजित करण्यात आला.

या वेळी एम. बी. मोरे संचालक अशोक मोरे, संचालक प्रथमेश मोरे, रोठ बुद्रुक सरपंच नितीन वारंगे, दीपिका चिपळूणकर,सुदर्शन केमिकल्स मॅनेजर विवेक गर्ग, कनिष्ठ महाविद्यालय, महिला पदवी महाविद्यालय प्राचार्य प्रसन्न म्हसळकर, इंग्लिश मिडियम स्कूल मुख्याध्यापक सुनीला आंग्रे आदी विद्यार्थी आणि पालकवर्ग उपस्थित होता.

उपस्थितांनी उद्घाटन कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणदर्शन कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. निकिता महाडिक, प्रा. नंदिनी जोशी आणि प्रा प्रतिमा भोईर यांनी केले. हा सोहळा यशस्वी होण्यास सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अविरत परिश्रम घेतले.

# बालनाट्य स्पर्धेत झोतिरपाडाच्या पायल कुथेची उत्कृष्ट कामगिरी



**नागोठणे : प्रतिनिधी**

१९ वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा ३ ते ७ जानेवारीदरम्यान साहित्य मंदिर सभागृह वाशी नवी मुंबई येथे नुकतीच झाली. या स्पर्धेत एकूण २७ नाट्यप्रयोग सादर करण्यात आले होते. तर परीक्षक म्हणून ज्ञानेश्वर गायकवाड, गौरी लोंढे, अभय अंजीरकर लाभले होते. रिलायन्स नागोठणे ग्रुप आयोजित बळी या नाटकातील गजरा या पात्र भूमिकेतील झोतिरपाडा गावची पायल लक्ष्मण कुथे हिच्या अभिनयास गुणवत्ता प्रमाणपत्र यादीत प्रथम क्रमांक मिळाला असुन सर्वच स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

संध्या कुलकर्णी लिखित जयंत तारकुंडे, सुखदा तारकुंडे दिगदर्शित बळी या नाटकात प्रत्येक जन कोणत्या ना कोणत्या कारणाने बळी ठरत असतो काही बाल कामगार म्हणून तर काही परिस्थिती मुळे बळी पडतात. अशा बालकामगारांची व्यथा या नाटकात उत्कृष्टपणे मांडण्यात आली आहे. या नाटकात पायल कुथे, श्रेयसी भगत, शौर्य कुर्ले, स्वरा कुथे, अन्वी पाटील, हर्ष पाटील, साक्षी कुथे, अस्मि कुर्ले, आर्यन कोपर्डे या बाल कलाकार सहभाग घेतला आहे. त्यांचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी अभिनंदन केले असुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# शरीरसौष्ठवपटू अभिषेक वर्तकचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड येथील शरीरसौष्ठवपटू अभिषेक वर्तक याने विविध ठिकाणी झालेल्या स्पर्धेत तसेच कृषक महोत्सव अलिबाग येथील शरीरसौष्ठव स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला होता. तसेच काही ठिकाणच्या स्पर्धेत त्याला किताब देऊन गौरवण्यात आले होते. या यशाबद्दल मुरूड शहरातील महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेचे चेरमन अजित गुरव व उपाध्यक्ष अनघा चौलकर यांच्या हस्ते अभिषेकला शाल, श्रीफळ सन्मानचिन्ह व रोख रक्कम चेक स्वरूपात देऊन त्याचा उचित सन्मान व सत्कार करण्यात आला आहे.



या वेळी महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन अजित गुरव यांनी अभिषेक वर्तकने विविध स्पर्धा जिंकून मुरूडचे नाव उंचावले आहे. अभिषेकचा आम्हाला सार्थ अभिमान असून त्याने यापुढेही स्पर्धा जिंकून मोठ्या स्पर्धेतही नाव कमवावे अशी अपेक्षा व्यक्त केली. शरीरसौष्ठव स्पर्धेत प्रगती करण्यासाठी आमच्या संस्थेकडून आर्थिक अल्पशी मदत केल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी उपाध्यक्ष अनघा चौलकर, सायली गुंजाळ, राहुल वर्तक, संदेश दांडेकर, आदेश दांडेकर, मंगेश पाटील, व्यवस्थापक राकेश मसाल, केतन वर्तक, गणेश वर्तक, कुमार वर्तक, अभिशेक यांच्या मातोश्री, योगेश अपराध, प्रथमेश भगत, विशाल विरकुड, सौ. वर्तक उपस्थित होते. सायली गुंजाळ व अन्य मान्यवरांची समयोचित भाषणे झाली. राहुल वर्तक यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# रायगडात कोळ्यांच्या आकर्षक प्रजाती

## पर्यावरण अन् कीटकप्रेमींना पर्वणी

**पाली : प्रतिनिधी**

सध्या जिल्ह्यात वेगवेगळ्या प्रकारच्या कोळ्यांच्या प्रजाती व त्यांची आकर्षक जाळी दृष्टीक्षेपात येत आहेत. विशेष बाब म्हणजे निसर्ग व कीटक अभ्यासक व प्रेमींना यांचे निरीक्षण व अभ्यास करणे सोपे जात आहे. या कोळ्यांची आकर्षक तसेच आकाराने मोठी जाळी व हे रुबाबदार रंगीत कोळी येणाऱ्या जाणाऱ्यांचे लक्ष वेधतात. जंगलात सर्रास आढळणारे हे कोळी रस्त्याच्या कडेला झाडे व झुडुपात पाहिल्यावर सर्वसामान्यांसाठी कुतूहलाचा विषय ठरतांना दिसत आहेत.



एरवी जंगलात आढळणारे हे कोळी हिवाळ्यामध्ये भक्ष्य कीटक मोठ्या प्रमाणात मिळत असल्याने जिल्ह्यातील रस्त्याच्या बाजूने असलेल्या झाडांवर व झुडुपांमध्ये जाळी करून राहतांना दिसत आहेत. आणि सहज दृष्टीक्षेपात पडत आहेत.

निसर्ग अभ्यासक व तज्ज्ञांनी सांगितले की, कोळ्यांचे विविध प्रकार असून, वर्गवारी त्यांच्या जाळे विणण्याच्या पद्धतीवरून केली जाते. Giant Wood Spider ही कोळ्यांची जात सर्वसामान्य आहे. वातावरणातील बदलांचा त्यांच्यावर फारसा परिणाम होतांना दिसत नाही. फक्त जंगले वाचली पाहिजेत. यामध्ये मादी मोठी असते आणि नर एकदम छोटा असतो. मीटिंग (संभोग) झाल्यावर ती नराला खाऊन टाकते. यांचे जाळे खूप मोठे असते. तर Funnel Web spiden हा कोळी नरसाळ्या सारखे आकर्षक जाळे विणतो. आणि त्यामध्ये भक्ष्य पकडतो.



कोळी हा संधिपाद संघातील ॲरॅक्निडा वर्गाच्या ॲरेनीइडा या गणात समाविष्ट असलेला आणि रेशीमसारखा धागा तयार करणारा एक अष्टपाद प्राणी आहे. जगात कोळ्यांच्या सुमारे ६० हजार ज्ञात जाती आहेत. प्रामुख्याने हे भूचर असले तरी त्यांच्या काही जाती सागरकिनारी पाण्यालगत आणि यूरोपिअन पाणकोळी ही जात गोड्या पाण्यातही आढळते. प्रामुख्याने कीटक भक्ष्य मिळू शकतात, अशा सर्व ठिकाणी कोळी आढळतात. वनात, शेतीच्या क्षेत्रात, घरात, वाळवंटात, दलदलीच्या प्रदेशात, उंच पर्वतावर, खोल खाणींमध्ये आणि अंधार्या गुफांमध्येही कोळी आढळतात. कोळी अन्नाशिवाय पुष्कळ दिवस जगू शकतात. त्यांना आपल्या शरीरात पुष्कळ अन्न साठवून ठेवता येते. काही कोळी टाचणीच्या डोक्याइतके लहान असतात, तर दक्षिण अमेरिकेतील टॅरांटुला जातीचे काही कोळी पाय पसरले असता २५ सेंमी. इतके मोठे असतात. कोळी बहुधा करड्या, तपकिरी अगर काळ्या रंगाचे असतात, पण काही कोळी फुलपाखरांप्रमाणे आकर्षक रंगांचे सुद्धा असतात. बहुतेकांचे शरीर केसाळ असते. हे केस आखूड आणि अतिशय संवेदी असतात.

रायगडात कोळ्यांच्या प्रजातींपैकी दोन प्रमुख प्रजाती आहेत. नरसाळ्यासारखे जाळे विणणारा कोळी, जंगलातील झाडांच्या खोडातील पोकळीमध्ये जाळे विणणारा कोळी मोठ्या प्रमाणात पहायला मिळत आहेत.

**या कोळ्यांना सध्या त्यांचे खाद्य कीटक व पतंग मोठ्या प्रमाणात भेटत आहे. हे कोळी वर्षभर भारतात सर्वत्र आढळतात. निसर्गतःच संरक्षित असल्याने त्यांना संरक्षणाची आवश्यकता नाही.**

**–शंतनू कुवेसकर, वन्यजीव अभ्यासक, रायगड**

# पारा घसरल्याने हवेत गारवा

## कडधान्य शेतीला पूरक हवामान; शेतकरी समाधानी

**माणगाव : प्रतिनिधी**

डिसेंबर महिना सुरू झाला तरी थंडीच्या मोसमाची प्रतीक्षा करणाऱ्या नागरिकांना गेल्या काही दिवसांत थंड हवेचा व दाट धुक्याचा अनुभव येऊ लागला आहे.

यावर्षीही लांबलेल्या पावसाने ऋतु चक्रावर परिणाम होऊन थंडी व धुके गायब झाले होते. ऑक्टोबर महिन्यात कडक उन्ह गायब झाले होते मात्र थंडीला जोर नव्हता त्यामुळे पावसाळ्यासारखे वातावरण सर्वत्र अनुभवायला मिळाले होते. नोव्हेंबर महिन्यात सुरू होणारी थंडी गायब होऊन थंडीचा मौसम लांबत गेला. डिसेंबर महिना सुरू झाला आणि थंडीची चाहूल लागली असून वातावरणात बदल होऊन सकाळी दाट धुके व थंडी सुरू झाली आहे. थंडीची चाहूल लागल्याने रब्बी पिकांचेही पोषण होणार असून या पिकांसाठी योग्य हवामान असल्याचे जाणकार शेतकरी सांगत आहेत.



डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यानंतर वातावरणात हलकासा गारवा जाणवू लागल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. सकाळी दाट धुके व सुखद गारवा हवेत जाणवू लागल्याने पहाटे थंडीचा अनुभव येऊ लागल्याचे दिसत आहे. वातावरणातही किमान १७ अंश सेल्सिअस खाली तापमान जात आहे.

हवेतला गारवा वाढल्याने तापमानाचा पाराही कमी झाल्याचे जाणवते. पुढील काही दिवसात थंडी वाढेल व गुलाबी थंडीचा अनुभव मिळेल असे जाणकार सांगतात. थंडीचे हवामान कडधान्य शेतीला पूरक असून शेतकरीही समाधान व्यक्त करीत आहेत. थंडीची चाहूल लागताच गावोगावी शेकोटी पेटवली जात असून शेकोटीचा आनंद लहान मुले व नागरिक घेताना दिसत आहेत.

**गेले काही दिवस सकाळी गारवा जाणवू लागला आहे. दाट धुके व थंडी वाढत असून. तापमानाचा पारा उतरला आहे. सकाळी गारवा व थंडी वाढत असल्याने हवामान आल्हाददायी वाटत आहे.**

**–भरत काळे, माणगाव**

**गेल्या काही दिवसांपासून सर्वत्र थंडी सुरू झाली आहे. थंडीमुळे रब्बी पिकांची चांगली वाढ होईल. थंड हवामान कडधान्य पिकाच्या वाढीसाठी आवश्यक आहे.**

**–सीताराम पोटले, शेतकरी**

### अंडर-१९ महिला विश्वचषक स्पर्धा

# भारताची विजयी सलामी

## यजमान दक्षिण आफ्रिका संघावर मात

**बेनोनी (द. आफ्रिका) : वृत्तसंस्था**

१९ वर्षाखालील महिलांच्या ट्रेन्टी-२० विश्वचषकत स्पर्धेत भारतीय संघाने आपल्या सलामीच्या सामन्यात यजमान आफ्रिकेच्या संघाला पराभूत करून विजयी सलामी दिली. द. आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ५ बाद १६६ धावा केल्या होत्या. भारताने हे लक्ष्य १६.३ षटकांत सात गडी आणि २१ चेंडू राखून पार केले.

या सामन्यात भारतीय संघाची कर्णधार शेफाली वर्माने केवळ १६ चेंडूंत ४५ धावांची स्फोटक खेळी केली. यात नऊ चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता, तर श्वेता सेहरावतने ५७ चेंडूंत ९२ धावांची नाबाद खेळी करून भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. श्वेताने २० चौकार ठोकले.



तत्पूर्वी, दक्षिण आफ्रिकेच्या संघाने नाणेफेक जिंकली आणि प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी ताबडतोब सुरुवात करून भारतीय गोलंदाजांवर दबाव टाकला होता. आक्रमक खेळी करणाऱ्या सिमोन लॉरेन्स ६१ धावांवर बाद करण्यात भारताला यश आले आणि यजमान संघाला मोठा झटका बसला. अखेरच्या काही षटकांमध्ये मॅडिसन लँड्समने १७ चेंडूंत नाबाद ३१ धावांची खेळी केली.

भारतीय संघाची कर्णधार शेफाली वर्माने अष्टपैलू खेळी करून संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. तिने चार षटकांत ३१ धावा देत दोन बळी टिपले. याशिवाय सोनम यादव आणि पार्शवी चोप्रा यांना प्रत्येकी एक विकेट्स घेतली.

**शफाली वर्माची वादळी खेळी**

विश्वचषकातील सलामीच्या सामन्यात कर्णधार शेफाली वर्माने १६ चेंडूंत ४५ धावा केल्या. यादरम्यान तिने एका षटकात पाच चौकार आणि एक षटकार लगावत एकूण २६ धावा केल्या. या षटकाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

# आंतरराष्ट्रीय लीग ट्वेन्टी-२०मध्ये मुंबई संघाची विजयी सुरुवात

**अबु धाबी : वृत्तसंस्था**

दुबईत सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय लीग ट्वेन्टी-२०मध्ये मुंबई इंडियन्स फ्रँचायझीच्या एमआय इमिरेट्स संघाने विजयी सलामी दिली. त्यांनी पहिल्या सामन्यात शारजा वॉरियर्सवर विजय मिळवला.

अबु धाबीच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या या सामन्यात शाजाह वॉरियर्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. एमआय एमिरेट्सकडून खेळणाऱ्या सलामीवीर महम्मद वसीमने याचा फायदा घेतला. वसीमने सुरुवातीपासूनच जोरदार फटकेबाजी करीत ३९ चेंडूंत पाच चौकार आणि पाच षटकारांसह ७१ धावांची दमदार खेळी केली. वसीमशिवाय यष्टीरक्षक फलंदाज निकोलस पूरननेही ३० चेंडूंत दोन चौकार आणि चार षटकारांसह ४९ धावांची खेळी केली. त्यामुळे किरॉन पोलार्डच्या नेतृत्वाखाली एमआय एमिरेट्सने ५ गडी गमावून २०४ धावा केल्या.



२०५ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना शारजा संघाचे फलंदाज एमआयच्या गोलंदाजांसमोर टिकू शकले नाहीत. त्याच्याकडून केवळ इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू ख्रिस वोक्सला २९ चेंडूंत नऊ चौकार आणि दोन षटकारांसह ६२ धावा करता आल्या. याशिवाय रहमानउल्ला गुरबाजनेही सलामीला खेळताना ३१ चेंडूंत ४३ धावांची खेळी केली, मात्र या दोघांशिवाय बाकीचे फलंदाज काहीही करू शकले नाहीत. त्यामुळे मोईन अलीच्या नेतृत्वाखालील शारजाहला २० षटकांत नऊ गडी बाद १५५ धावाच करता आल्या आणि त्यांना ४९ धावांनी पराभवाला सामोरे जावे लागले. एमआय एमिरेट्सकडून इम्रान ताहिरने सर्वाधिक तीन विकेट घेतल्या.



तिरूवनंतपूरम : श्रीलंकेविरुद्धच्या तिसऱ्या व शेवटच्या एकदिवसीय सामन्यात भारताकडून स्टार फलंदाज विराट कोहलीसह युवा खेळाडू शुबमन गिल यानेही शतकी खेळी केली.

# युवोन्मेष समुहाची क्रिकेट स्पर्धा रंगली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल ब्राह्मण सभा प्रस्तुत युवोन्मेष समुहाच्या वतीने बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सुकापूर येथील मैदानावर स्पर्धा रंगली.

लहान मुले, युवा, ज्येष्ठ नागरिक व महिला अशा सर्व वयोगटातील संमिश्र नागरिकांच्या संघांमधे खेळीमेळीच्या वातावरणात झालेले सामने हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य ठरले.

सुशांत जाधव, महेश पेंडसे, ऋषिकेश केळकर यांनी पंच म्हणून काम पाहिले. तुषार दानवे, प्रसाद जोशी, निलेश देव यानी समालोचन केले. ब्राह्मण सभेच्या अध्यक्ष दिपाली जोशी, सचिव मंजुषा भावे, खजिनदार वैशाली सरदेशपांडे, यांच्यासह विनया वाळिंबे, मिलिंद गांगल, प्रशांत सदावर्ते आदी कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विजेते, सामनावीर, मालिकावीर व उत्कृष्ट फलंदाज व गोलंदाज यांना चषक व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

शार्दूल दामले, आकाश कोल्हटकर, देवेश पेंडसे आदींसह 'युवोन्मेष'च्या कार्यकर्त्यांनी स्पर्धेचे नियोजन केले. बऱ्याच वर्षांनंतर युवा पिढीबरोबर खेळण्याचा आनंद घेतल्याची प्रतिक्रिया सहभागी ज्येष्ठ नागरिक व महिलांनी व्यक्त केली.


**युवा पिढी क्रिकेटचा आनंद घेते. त्यांच्यासह ज्येष्ठ नागरिक व महिलांनाही खेळाचा आनंद मिळावा यासाठी युवोन्मेष समुहाने हा उपक्रम राबवला. उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात युवा पिढीबरोबर खेळणे ही ज्येष्ठांसाठीही आनंदाची पर्वणी ठरली.**
**-शार्दूल दामले, युवोन्मेष समूह**



# 'हिंदकेसरी' अभिजित कटके म्हणतो, आता लक्ष्य ऑलिम्पिक!

**पुणे : प्रतिनिधी**

'हिंद केसरी'चे मैदान मारणारा पुण्याचा मल्ल अभिजित कटके याने आता आपले ऑलिम्पिकच लक्ष्य असल्याचे म्हटले. अभिजितने शुक्रवारी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेला उपस्थिती लावली. त्या वेळी अभिजितशी संवाद साधला असता त्याने कुस्ती आणि महाराष्ट्राची प्रगती याबाबत आपली मते व्यक्त केली.



आपल्या कारकिर्दीबद्दल माहिती देताना अभिजित म्हणाला की, माझे वडील चंद्रकांत कुस्ती खेळायचे, पण त्यांची कुस्ती कायम ठेवण्याची इच्छा पूर्ण झाली नाही. त्यानंतर त्यांनी माझ्यात त्यांचे स्वप्न पाहिले. वडिलांनी कुस्तीचे प्राथमिक धडे दिले. लहानपणापासून शिवरामदादा तालमीतच माझी जडणघडण झाली. वयाच्या दहाव्या वर्षांपासून सुरू झालेला हा प्रवास नंतर जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरावर येऊन पोहोचला. कुमार गटात राष्ट्रीय पातळीवर नाव कमावले आणि हा स्पर्धात्मक प्रवास जसा वाढला तशी माझ्या खेळात प्रगती झाली. या सगळ्या प्रवासात वस्ताद गुलाब पटेल, हणमंत गायकवाड, भरत म्हस्के, अमर निबाळकर यांनी माझ्यावर खूप मेहनत घेतली.

कुस्तीला सुरुवात केल्यावर आपल्याला याच खेळात नाव कमवायचे हे निश्चित केले होते. मोठ्या कुस्ती जिंकायचे स्वप्न निश्चित उराशी होते. पण, तेथपर्यंत पोचण्यासाठी मेहनत महत्त्वाची होती. त्यामुळे एकेक पायरी पार करीत प्रथम 'महाराष्ट्र केसरी'चे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवले आणि ते स्वप्न पुण्यातच २०१७मध्ये साकार झाले याचा अधिक आनंद आहे. त्यानंतर मेहनत कायम ठेवली. पूर्ण तयारी झाली तेव्हाच हिंद केसरी स्पर्धेत लढण्याचा निर्णय घेतला. गेल्याच आठवड्यात हैदराबादमध्ये हरयाणाच्या सोमवीरला पराभूत केले तेव्हा वडिलांचे स्वप्न साकार झाल्याचा आनंद झाला. वडिलांनी माझ्यासाठी खूप मेहनत घेतली. त्यामुळे मला माझ्या मेहनतीपेक्षा वडिलांना मला घडविण्यासाठी सोसावा लागलेला त्रास अधिक मोलाचा वाटतो. ते नसते तर मी घडलोच नसतो, असे अभिजितने नमूद केले.

**कठोर मेहनत आवश्यक**


महाराष्ट्रातील कुस्तीबद्दल अभिजितने सांगितले की, महाराष्ट्रातील कुस्ती सध्या निश्चित प्रगती करते आहे. कुमार आणि खुल्या पातळीवर महाराष्ट्राचे मल्ल आपले नाव ठसठशीतपणे उमटवत आहेत. गादीवरील कुस्ती आता अधिक लोकप्रिय होत आहे. या बदलाशी महाराष्ट्रातील मल्लांनी चांगले जुळवून घेतले आहे. त्यामुळेच महाराष्ट्रातील मल्ल मोठ्या व्यासपीठावर यशस्वी होताना दिसून येतात. या मल्लांनी डोळ्यांसमोर मोठे उद्दिष्ट ठेवले, तर त्यांना यशापर्यंत जाण्याचा मार्ग सापडू शकतो. या प्रवासात कठोर मेहनत घेणे आवश्यक आहे.

# बॉर्डर-गावसकर चषक मालिका आता नव्या स्वरूपात रंगणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) निवड समितीने ऑस्ट्रेलियाविरुद्ध संघाच्या घोषणेबरोबरच बॉर्डर-गावसकर चषक मालिकेचा चार कसोटी सामन्यांचा पारंपरिक फॉरमॅट बंद होणार असल्याचीही घोषणा केली. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील मालिका आता नव्या रूपात प्रेक्षकांच्या समोर येणार आहे.

भारतीय निवड समितीने न्यूझीलंडविरूद्धच्या वनडे आणि टी २० मालिकेसाठी संघाची घोषणा केली. त्याचबरोबर भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात




होणाऱ्या बॉर्डर-गावसकर कसोटी मालिकेतील पहिल्या दोन सामन्यांसाठीदेखील संघाची घोषणा केली. ही मालिका ९ फेब्रुवारीपासून नागपूरमधून सुरू होत आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांची यंदाच्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमधील ही शेवटची मालिका असणार आहे.

बॉर्डर-गावसकर ही चार सामन्यांची कसोटी मालिका पाच सामन्यांत बदलण्याबाबत अनेक काळापासून चर्चा सुरू होती. आता बीसीसीआयने आपल्या वक्तव्यात सांगितले की, बॉर्डर-गावसकर ट्रॉफीचा हा चार कसोटी सामन्यांचा जुन्या फॉरमॅटमधील शेवटचा हंगाम असणार आहे. २०२३-२५मध्ये पहिल्या पाच सामन्यांच्या मालिकेचा सेट भारतात होणार आहे, तर २०२५-२७मध्ये दुसरा सेट ऑस्ट्रेलियात होईल.


# सानियाने निवृत्तीच्या पोस्टमध्ये पती शोएबचा उल्लेख टाळला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची स्टार महिला टेनिसपटू सानिया मिर्झाने निवृत्तीची घोषणा केली आहे. येत्या काही महिन्यांत ती अखेरची कोर्टवर दिसणार आहे. दरम्यान, क्रीडा क्षेत्रात तिच्या निवृत्तीपेक्षा तिने लिहिलेल्या नोटची चर्चा अधिक रंगली आहे. तिने या नोटमध्ये तिच्या जवळच्या सर्वांचा उल्लेख केला, पण पती शोएब मलिकचे नाव दिसले नाही. त्यामुळे तिच्या घटस्फोटाच्या चर्चेला पुन्हा जोर आला आहे.

टेनिसमधून निवृत्तीची घोषणा करत सानिया मिर्झाने सोशल मीडियावर एक भावनिक नोट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिने आपल्या यशस्वी टेनिस प्रवासाबद्दल आई-वडील, बहीण, प्रशिक्षक, फिजिओ या सर्वांचे आभार मानले आहेत, मात्र सानियाच्या पोस्टमध्ये तिचा पती शोएबचे नाव कुठेही दिसले नाही. गेल्या काही दिवसांपासून दोघांमध्ये घटस्फोटाच्या अफवा उडत होत्या. दुसरीकडे, सानियाच्या निवृत्तीच्या पोस्टमध्ये शोएबचे नाव नसल्याने या अफवांना जोर आला आहे.

लवकरच कायदेशीर बाबी पूर्ण करून सानिया आणि शोएब घटस्फोटाची घोषणा करणार आहेत, मात्र या संदर्भात दोघांकडून अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.




**पनवेल : सध्या क्रिकेटचा हंगाम सुरू आहे. त्या अंतर्गत आरिवली येथे आई गावदेवी क्रिकेट संघाच्या वतीने टेनिस क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेचे उद्घाटन भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. या वेळी त्यांनी जोरदार फटकेबाजी केली तसेच खेळाडूंना प्रोत्साहित केले. माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, कसळखंडचे माजी उपसरपंच महेंद्र गोजे उपस्थित होते, तर पोयंजे येथे मोहोपे स्पोर्ट्स आणि खांदा कॉलनीत जय हनुमान क्रिकेट संघाच्या वतीने कै. प्रितम घरत चषक या क्रिकेट स्पर्धांनाही अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. तेथे ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि खेळाडू उपस्थित होते.**

(छाया : विकास म्हात्रे)









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com